| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २१० वा | शनिवार दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### चांदीच्या दागिण्याची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बालाजी भारत गायकवाड, वय ४१ वर्षे, रा. घर मालक लहु उत्तम कुठे यांचे विजयनगर भुम ता. भुम जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.१७.१०.२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन कपाटामध्ये ठेवलेले ३५ भार चांदीचे दागिने, एकुण २०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बालाजी गायकवाड यांनी दि.२७.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सरकारी दवाखाना धाराशिव येथे उपचार घेताना पर्स मधील रोख रकमेची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रेखा रविंद्र काकडे, वय ७० वर्षे, रा. पांगरी ता. बार्शी जि. सोलापूर या दि.२७.१०.२०२५ रोजी सरकारी दवाखाना धाराशिव येथे उपचार करीता आल्या असता रेखा काकडे यांचे पर्स मधील रोख रक्कम २५,००० ३ ग्रॅमचे सोन्याचे दागिने असा एकुण ३६,५०० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रेखा काकडे यांनी दि.२७.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२), अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पोलीसांची जुगार विरोधी कारवाई: गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान आनंदनगर पोलीसांनी दि.२७.१०.२०२५ रोजी आनंदनगर पो ठाणे हद्दीत नगरपालिका धाराशिवच्या गेट समोर छापा टाकला. यावेळी दत्ता वय ५७ वर्षे रा.गायकवाड गल्ली नेहरु चौक धाराशिव ता. जि. धाराशिव हे नगरपालिका धाराशिवच्या गेट समोर गणेश कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ७५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले आनंदनगर पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### पानबुडी मोटार, केबल व स्टार्टरची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी औदुंबर अरुण पाटील, वय ५२ वर्षे, रा. भिकार सारोळा ता. जि. धाराशिव यांचे भिकारसारोळा शिवारातील शेतगट नं ६० मधील विहीरीवरील ३ एच पी ची पानबुडी मोटार व केबल १०० फुट स्टार्टर असा एकुण १५,००० किंमतीचा माल दि.२१.१०.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. औदुंबर पाटील यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# पुरग्रस्तांना १९० कोटी रुपयांची मदत खात्यावर ईकेवायसी करुन घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन





धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- जून ते सप्टेंबर या कालावधीत अतिवृष्टी, पूरात नुकसान, जमिन वाहून नुकसान आदी संदर्भात शासनाने ५ जीआर निघाले आहेत. जिल्ह्यासाठी ५२३ कोटी ९८ लाख रुपयांचे निधी मंजूरही झाला आहे. त्यापैकी १९० कोटी रुपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केल्याची माहिती जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी केली.

अतिवृष्टीच्या अनुदान वितरणासंदर्भात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात केले होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी मैनांक घोष, जिल्हा पोलिस अधीक्षक ऋतू खोकर, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांची उपस्थित होती. जिल्हाधिकारी म्हणाले की, पूरात ८ जण वाहून गेले आहेत. इतर कारणांमुळे १ जणांचा मृत्यू झाला. मयतांच्या कुटूंबांना ४ लाख रुपयांप्रमाणे ३६ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. पावसात ३ हजार ४०३ घरांची अंशत पडझड झाली आहे. त्यापैकी २३९० जणांना ९५ लाख ६० हजार रुपयांची मदत दिली आहे. ढगफुटी सदृश्य पावसामुळे तब्बल ४० हजार ८३५ शेतकऱ्यांची ११ हजार ८१ हेक्टर जमिन वाहून गेली आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत ६३ हजार ४१४ शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. शासनाकडून ५२३ कोटी ९८ लाख रुपये अनुदान मंजूर झाले आहे. त्यापैकी शासनाकडून ४०० कोटी रुपये अनुदानाच्या याद्या अपलोड करण्यात आल्या आहेत. १९० कोटी रुपये वितरीतही करण्यात आले आहेत. ॲग्रीस्टकची ६ लाख ६७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. एकूण खातेदारांच्या तुलनेत ७६.९६ टक्के ॲग्रीस्टॅकचे काम झाले आहे. ज्यांची ई-केवायसी राहिली आहे, त्यांनी ई-केवायसी करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

आखणी दोन ते तीन जीआर निघणार रब्बी हंगामात हेक्टरी १० हजार रुपयांची मदतीची मागणी शासनाकडे केली आहे. ती रक्कम लवकरच शेतकऱ्यांना मिळेल. आणखी दोन ते तीन जीआर निघणार आहेत. त्या निकषाप्रमाणे मदत होणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

# वाशी-पारा रस्त्याला झुडपांचा विळखा, मागील आठवड्यातच झुडपांमुळे वाहन न दिसल्याने अपघात



वाशी वाशी शहराला जोडणाऱ्या वाशी-पारा या दहा किलोमीटर रस्त्याची निधीअभावी दुरवस्था झाली आहे. मागील आठ दिवसात झालेल्या दोन अपघातात तरुणाला जीव गमावावा लागला. तर एक गंभीर जखमी असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. मागील चार वर्षांपूर्वी डांबरीकरण झालेल्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी रस्ता उखडला आहे. तालुक्यातील पारा, डोंगरेवाडी, सारोळा (मां), लाखणगाव, सेलू, कवडेवाडी, सारोळा, पिंपळवाडी या गावांना शहराशी जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून मागील चार वर्षांपूर्वी डांबरीकरण झाले होते. त्या रस्त्याची आता दुरवस्था झाली आहे. या रस्त्याच्या बांधणीवेळी स्थानिक नागरिकांनी रस्त्याच्या गुणवत्तेबाबत वारंवार तक्रारी केल्या होत्या. पण संबंधित अधिकारी, पुढारी व गुत्तेदारांच्या हितसंबंधांतून बनवलेला रस्ता अवघ्या काही महिन्यांत उखडू लागला आहे. होणाऱ्या अपघाताकडे डोळेझाक झाल्याने या खड्ड्यांनी आता जीवघेणे रूप धारण केले आहे. याचा गंभीर परिणाम तालुक्याच्या बाजारपेठेवर, आरोग्य सेवा, शिक्षणावर झाला आहे. १० किमी रस्त्यावर केवळ खड्डे आणि दोन्ही बाजूंनी झाडांनी घेतली आहे. या रस्त्यावर असलेल्या वळण रस्त्यावर झाडांच्या वेढ्यामुळे या मार्गाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष पारा परिसरातील दहा गावांतून वाशी येथे शाळा, महाविद्यालयासाठी विद्यार्थ्यांची ये-जा असते. वाशीला मोठा बाजार असल्याने शेतकरी कृषिमाल विक्रीसाठी येतात. दवाखाना, कचेरीच्या कामासाठी येणारांची गर्दी असते. असे असताना या मार्गाकडे साफ दुर्लक्ष झाले आहे. निधी येईल तेव्हा कार्यवाही वाशी पारा रस्त्याचा दुरुस्ती कालावधी संपला आहे. झाडे काढण्यासही निधी नाही. रस्त्याच्या सिमेंटीकरणाचा प्रस्ताव पाठवला आहे. निधी येईल तेव्हा कार्यवाही होईल. - प्रदीप धस, अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना वारंवार दुरूस्तीची मागणी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सातत्याने कल्पना देऊन दुरुस्तीची मागणी करत आहोत. मात्र त्यांच्याकडून गुत्तेदाराचे हित जोपासण्यात येत असल्याने हा रस्ता जीवघेणा झाला आहे. -सुनील उंदरे, सरपंच, पिंपळवाडी वाशी पारा रस्त्याच्या कडेला वाढलेली झाडे आणि खड्डे पडल्यामुळे वारंवार या रस्त्यावर अपघाताचे सत्र वाढले आहे. समोरून येणारे वाहन दिसत आहे. मागील आठ दिवसांपूर्वी या रस्त्यावर वळण रस्त्यावर मोठे वाहन न दिसल्याने दोन अपघात झाले. ज्यातील एका तरुणाला आपला जीव गमवावा लागला आहे. तर दुसऱ्या अपघातातील शेतातून परतणाऱ्या तरुणाचा अपघातात पायाला गंभीर जखम होऊन शस्त्रक्रिया करून उपचार सुरू आहेत. याबाबत संबंधित प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांकडून निधी नाही. झाडे काढण्याएवढाही निधी नसल्याची सबब देण्यात येत असल्याने या मार्गावरून ये-जा करणाराला जीव मुठीत घेऊन राम भरोसे प्रवास करावा लागत आहे.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ 'विशेष घटक व बीजभांडवल योजनांसाठी अर्ज मागविले'

धाराशिव, (जिमाका)- महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मुंबई यांच्या माध्यमातून सन २०२५-२६ या वर्षासाठी विशेष घटक योजना तसेच बीजभांडवल योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१) विशेष घटक योजना :**

सन २०२५-२६ या वर्षासाठी या योजनेचे उद्दिष्ट ५ लाभार्थ्यांचे आहे.या योजनेअंतर्गत प्रकल्प मर्यादा ५० हजार रुपयांपर्यंत असून,प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्क्यांपर्यंत अनुदान महामंडळाकडून देण्यात येते. उर्वरित ५० टक्के रक्कम बँकेमार्फत कर्जरूपाने उपलब्ध करून दिली जाते. उदा. - २५ हजार रुपये अनुदान व २५ हजार रुपये बँक कर्ज. बँकेकडून दिल्या जाणाऱ्या कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारण्यात येते.कर्जाची परतफेड सामान्यतः ३ वर्षांच्या कालावधीत करावयाची असते.

**२) बीजभांडवल योजना :**

या योजनेसाठीही सन २०२५-२६ मध्ये ५ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

योजनेअंतर्गत प्रकल्प मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत असून,प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीजभांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ टक्के वार्षिक व्याजदराने दिले जाते.या रकमेतील ५० हजार रुपये हे महामंडळाचे अनुदान म्हणून समाविष्ट आहे. प्रकल्पाच्या ७५ टक्के रकमेचे बँक कर्ज दिले जाते व त्यावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारले जाते.महामंडळाचे व बँकेचे कर्ज एकत्रितरित्या समान मासिक हप्त्यांद्वारे ३ ते ५ वर्षांच्या आत परतफेड करणे आवश्यक आहे.योजनेसाठी अर्जदाराकडून ५ टक्के स्व:ताचा सहभाग आवश्यक आहे. म्हणजे एकूण निधीचे प्रमाण असे - बँक कर्ज ७५ टक्के, महामंडळ २० टक्के व अर्जदाराचा सहभाग ५ टक्के आहे.

इच्छुक लाभार्थ्यांनी ाहरवळीहर. ालिलवल.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत.अर्ज करताना अर्जदारांनी स्वतःच्या ई-मेल अकाऊंटद्वारे ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावा व त्याची मूळ प्रत तसेच आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती जिल्हा कार्यालयात स्वतः सादर कराव्यात. त्रयस्थ व्यक्तीकडून अर्ज अथवा इतर वैधानिक दस्तऐवज स्वीकारले जाणार नाहीत,याची लाभार्थ्यांनी विशेष नोंद घ्यावी.

अधिक माहितीसाठी इच्छुक लाभार्थ्यांनी जिल्हा व्यवस्थापक,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, धाराशिव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,तळ मजला,येथे संपर्क साधावा.




# भूम शहरात पहाटे सलग तीन ठिकाणी चोरी

भूम -शहरात गुरुवारी, ३० ऑक्टोबरच्या पहाटे सलग तीन चोरीच्या घटनांनी खळबळ उडाली आहे. शहरातील परंडा रोडवरील सुहास देशमुख यांच्या श्री काळभैरव मशिनरी, पार्डी रोडवरील दुर्गेश तोडकरी यांच्या मंगल मशिनरी तसेच याच परिसरातील शिक्षक अनिल दुधाळ यांच्या घरात चोरट्यांनी हात साफ केला. चोरट्यांनी उचकटलेली शटर, तुटलेले दरवाजे आणि अस्ताव्यस्त घर पाहून नागरिक हबकले. शहरातील व्यापारी व नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घर फोडून सोने -रोख रकमेसह ऐवज लंपास, अनिल दुधाळ हे पुण्यात असल्याची माहिती मिळाल्याचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या घराचे गेट व सुरक्षा दरवाजा तोडला. कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा ऐवज चोरट्यांनी पळवला. वरच्या मजल्यावरील भाडेकरूंनी सकाळी दरवाजा उघडा पाहिल्यानंतर प्रकार उघडकीस आला.

**पाणबुडी मोटारीची चोरी :** शहरातील परंडा रोडवरील श्री काळभैरव मशिनरीचे शटर उचकटून शटरजवळ ठेवलेली पाणबुडी मोटार चोरट्यांनी चोरली. शटर पूर्णपणे उघडता न आल्याने इतर ऐवज चोरता आला नाही. शेजारील व्यापाऱ्यांनी ही घटना देशमुख यांना कळवली. भाडेकरूंनी सीसीटीव्ही तपासण्यासाठी तोडकरी यांना बोलावले असता त्यांच्या मंगल मशिनरी दुकानातही चोरी झाल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी दुकानाबाहेरील सीसीटीव्ही कॅमेरे तोडून टाकले होते. प्राथमिक तपासात दुकानातून ६ ते ७ हजार रुपये रोख आणि दोन मोटारी चोरीस गेल्याचे समोर आले आहे.

# प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना : जनजागृतीपर कार्यशाळा संपन्न




धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यातील बारा बलुतेदारांना अवजारे व साधनांचा वापर करून तसेच हाताने काम करणाऱ्या पारंपरिक कारागीर आणि हस्तकलेच्या लोकांना ओळख प्राप्त करून देण्यासाठी आणि त्यांना सर्वांगीण आधार देऊन त्यांच्या विकासासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना सुरू केली आहे.

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ज्या लाभार्थ्यांनी अर्ज केला आहे,अशा सर्व लाभार्थ्यांसाठी व्यवसाय करण्यासाठी बँकेकडून देण्यात येणारे कर्ज,उद्योग केंद्राकडून देण्यात येणारे टुलकिट व इतर बाबींशी निगडित अडचणी जाणून घेण्यासाठी व त्यांचे निराकरण करण्यासाठी सूक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय (एमएसएमई) विकास कार्यालय,छत्रपती संभाजीनगर आणि जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आज एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेच्या वेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक महादेव बळे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महादेवी रणदिवे,सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक संचालक राहुल मिश्रा,तसेच मुंबई येथील प्रसिद्ध उद्योजक अशोक चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेत प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांना प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर टपाल कार्यालयाकडून टूलकिट मिळाले किंवा नाही,या योजनेतून ज्या लाभार्थ्यांना बँकेने कर्ज मंजूर करून वाटप केले आहे,तसेच ज्या लाभार्थ्यांना फक्त कर्ज मंजूर केले परंतु वाटप केले नाही,कर्जाचे प्रस्ताव नामंजूर केले गेले किंवा असे प्रस्ताव दुसऱ्या बँकेस पाठविण्यासाठी येणाऱ्या अडचणी अशा विविध बाबींचे निराकरण करण्यात आले.

या कार्यशाळेमध्ये प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले.तसेच विविध मान्यवरांनी यावेळी या योजनेच्या लाभार्थ्यांना विविध व्यवसाय करण्यासाठी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक अजयसिंह पाटील, उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी पांडूरंग मोरे,तसेच या योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळंब पोलीसांचे एकता दौड




कळंब (प्रतिनिधी)- येथील पोलीस ठाणे यांच्या वतीने दि. ३१ रोजी सकाळी ७ ते ८ या दरम्यान कळंब शहरातून विद्याभवन हायस्कूल ते छत्रपती संभाजी महाराज चौक ते जिजामाता चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अहील्याबाई होळकर चौक ते पोलीस ठाणे कळंब असा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. सदर दौड मध्ये उप विभागीय पोलीस अधिकारी संजय पवार, पोलीस निरीक्षक अजित चिंतले , सपोनि प्रभा पुंडगे , सपोनि हनुमंत कांबळे, सपोनि पंढरीनाथ मगर सह ४० पुरुष अंमलदार, १० महीला अंमलदार यांनी सहभाग घेतला होता . या दौडची सांगता कळंब पोलीस ठाण्यात राष्ट्रगीताने करण्यात आली .

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीकडे वाटचाल!

सत्ताधाऱ्यांनी जाहीरनाम्यात जाहिर केल्यानुसार आम्ही कर्जमाफीची घोषणा केली होती, असे सांगतानाच ३० जून २०२६ पूर्वी राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली ही एक समाधानाची बाब आहे. बच्चू कडू यांनी नागपुरात शेतकरी कर्जमाफी व इतर मागण्यांसाठी आंदोलन छेडले होते. याबाबत आंदोलक नेत्यांची मुंबईत रात्री उशिरा सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत बैठक पार पडली. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी रेल्वे रोको आंदोलन करण्यात येणार नाही, अशी ग्वाही गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला दिली. शेतकरी आंदोलनामुळे वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला होता. त्यानंतर नागपूर खंडपीठाने त्याची दखल घेतली होती. त्यानंतर हा तोडगा जाहिर करण्यात आला. शेतकऱ्याची सध्याची स्थिती पाहाता समाधानाची नाही. पावसाने पार शेतकऱ्यास धुतले आहे. शेतकरी विशेष करून मराठवाड्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या पार कोलमोडला आहे. वास्तविक राज्यतील शेतकऱ्याची स्थिती समाधानाची नाही. निसर्गाने मोठे नुकसान केले आहे. ही वस्तूस्थिती सरकारलासुद्धा माहिती आहे. त्यामुळे केवळ मदतीचे आश्वासन मिळत आहे. प्रत्यक्षात कांहीच्या खात्यात नुकसान भरपाई मिळाली असून अजून अनेक यापासून दूर आहेत. त्यामुळे शेतकऱ्यास मदत केली माहिती याला कोणाचाही विरोध नाही. असण्याचे कारण ही नाही. शेतकऱ्याच्या प्रश्नाबाबत बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. ते पुर्वीपासून सामाजिक कामात अग्रेसर आहेत. अपंगांना न्याय मिळऊन देण्यात मोलाचे कार्य त्यांच्या हातून होते. प्रहार ही संघटना चांगले काम करीत आहे. असे असताना त्यांनी शेतकऱ्याच्या प्रश्नाबाबत आवाज उठविला आहे. कर्जमाफीची मागणी केली आहे. कर्जमाफीची सवय शेतकऱ्यात नव्हती. शेतकरी कर्ज काढून सण साजरा करणारे नाहीत. आहे त्या प्रसंगाला तोंड देऊन वाटचाल करणारा शेतकरी आज निसर्गाने म्हणा किंवा पावसाने झोडपल्याने आर्थिक संकटात सापडला आहे. तरी अजून पंचनामे चालूच आहेत. पंचनामे केल्याशिवाय नुकसानीचा अंदाज येणार नाही. ही वस्तस्थिती असली तरी किती नुकसान झाले हे प्रगत विज्ञानाद्वारे कळू शकते. अत्याधुनिक यंत्रणेद्वारे कळून येते. तरीही सत्तर वर्षाचा काळ उलटला तरी पंचनामे ही जुनी पद्धत आवलंबली आहे. पुर्वी पंचनामे म्हणत, का म्हणत तर एखाद्या घटना चुकीची होवू नये, न्याय मिळावा म्हणून पाच जणाच्या समोर घटनेची माहिती संकलीत केली जात होती. पाच जणाच्या सह्या, अंगठे घेत असत. पुर्वी कॅमरे नव्हते, व्हीडीओग्री नव्हती, सीसीटीव्ही नव्हत्या. सेटेलाईटची सुविधा नव्हती किंवा ड्रोनही नव्हते. आता पुर्वीपेक्षा प्रगत विज्ञानाच्या माध्याद्वारे प्रगती केली तरी शेतात जाऊन पंचनामे करा म्हणणे सोपे मात्र सध्याला पाणीच राणात आहे. मुळात ज्यांना अधिकार पंचनाम्याचे दिले आहेत ते ही सध्याच्या स्थितीत नुकसानग्रस्त ठिकाणी पोंहचणे आवघड आहे. त्यामुळे पंचनाम्यास विलंब लागत आहे. वास्तविक सरकारने ड्रोनच्या किंवा अन्य अत्याधुनिक यंत्रणेची मदत घेणे आवश्यक आहे. विज्ञान हे खोटा पंचनामा करू शकत नाही. ही वस्तूस्तिथी सर्वांना माहिती आहे तरी जुन्या पद्धतीत आडकत असल्याने आज मदतीस उशीर होत आहे ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे सरकारने आता शेतकऱ्यास कर्जमाफी करू असे आश्वासन दिले आहे. कोणत्या शेतकऱ्यावर मोठे कर्ज आहे. शेतकरी हा पुढारी, मोठा राजकारणी असेल तरच त्याना बँका मदत करतात. एखाद्या फाटक्या शेतकऱ्यास मदत करते का? याचा विचार केला पाहिजे. सोसायट्या असो किंवा गरीब शेतकऱ्यास लई झाले पाच हजाराचे कर्ज मिळते. मोठे कर्ज कोणाला मिळतात व माफीचा लाभ कोणाला मिळतो हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान उंचविण्यासाठी कर्जमाफी हा पर्याय नाही. हे पहिल्यांदा लक्षात घ्यावे लागेल. शेतकऱ्यास वेगळ्या पद्धतीने मदतीची गरज आहे. ती म्हणजे कृषी विभागाकडून नांगरणी, पेरणी, बियाणे, खते याचा सोय करणे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे, प्रगत हवामान विभाग निर्माण करणे, अंदाज नको, अंदाजाने पार वाट लागली आहे. त्यामुळे कर्ज माफी द्या मात्र शेतकऱ्याचे आर्थिकजीवनमान कसे सुधारेल याचा विचार करा. शेतीमालास योग्य भाव द्या, सोयाबिनला किमान दहाहजार क्विंटल दर द्या, मुळात शेतकऱ्यास त्याच्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार द्या. हे न करता कर्जमाफी द्यायची, पुन्हा कर्ज घ्यायचे पुन्हा माफीची मागणी, आंदोलन सुरूच! हे चक्र आहे ते लावले गेले आहे. त्यामुळे सरकारला काही समजते मात्र आता पर्यंत जे चालत आले आहे तेच चालू देत आहेत. त्यात बदल नाही. पंचनामे ही पद्धत बंद करा. तातडीने नुकसान अत्याधुनिक यंत्रणेद्वारे केल्यास समजते. द्यायाचे झाले तर एका दिवसात लाडक्या बहिणीस मदत खात्यात जमा होते. आता नियमावली लावली जात आहे. देण्याची मानसिकता असली पाहिजे. बच्चू कडू यांचा प्रयत्न प्रामाणिक आहे. मात्र मागणी करताना तातडीने पदरात पडले पाहिजे. करू किंवा देऊ असे आश्वासने काही कामाचे आहेत का? याचा विचार आता करण्याची गरज आहे. मुळात आपल्या राज्यात मराठवाड्यातील शेतकरी संकटात सापडला आहे, त्याची दिवाळी कशी गेली हे सांगणे नको. त्यामुळे मदतीची गरज आहे यात शंका नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी सुद्धा विचार केला पाहिजे की, आता इतरांनी देण्याने प्रश्न सुटत नाही. सर्वजनाचा माल परदेशात जाईलच असा नाही. आपल्या मालाची आपणच मार्केटींग करण्याची गरज आहे. जे काही शेतात पिकते ते शहरात बैलगाडी तर नाहीत त्यामुळे टेम्पोत आणून थेट ग्राहकापर्यंत माल पोंहचविणे आवश्यक आहे. ज्वारी असो किंवा गहु तसेच डाळी असोत ते बाजारात मालक, व्यापारी म्हणून उतरणे काळाची गरज आहे. जो पर्यंत आपण आपल्या मालाचे मालक होणार नाही तो पर्यंत आर्थिक दारिद्र्य संपणार नाही. कर्ज माफी हा कायम स्वरुपी उपाय नाही तर आर्थिक जीवनामन कसे सुधारेल ही बाब पहिल्यांदा लक्षात घेतली पाहिजे.

# राष्ट्रीय लेखक दिन : समाजाचे आरसे आणि परिवर्तनाचे शिल्पकार

लेखन हे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, तर समाजाच्या विचारसंस्कृतीचे, भावविश्र्वाचे आणि काळाच्या स्पंदनाचे दस्तऐवजीकरण असते. म्हणूनच लेखक हा समाजाचा सजग साक्षीदार, चिंतक आणि परिवर्तनाचा वाहक असतो. दरवर्षी १ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय लेखक दिन (National authors Day) हा दिवस या शब्दशिल्पींच्या कर्तृत्वाला, चिंतनाला आणि समाजातील योगदानाला सलाम करणारा दिवस आहे. साहित्य, समाजशास्त्र आणि सांस्कृतिक परंपरेच्या संगमातून लेखक समाजाला आरसा दाखवतो, प्रश्र्न विचारतो आणि कधी कधी त्या समाजाला बदलाच्या दिशेने नेतो. या दिवसाचे महत्त्व फक्त लेखकाच्या गौरवापुरते मर्यादित नाही; ते सामाजिक जाणीवेचा, वैचारिक संवादाचा आणि सांस्कृतिक बांधिलकीचा उत्सव आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, लेखकाचे कार्य हे समाजरचनेच्या विविध घटकांशी निगडित असते. एमिल दुर्खाईमसारख्या समाजशास्त्रज्ञाने 'सामाजिक वास्तव' (Social Facts) या संकल्पनेद्वारे सांगितले की, समाजातील मूल्ये, विचार आणि नैतिकता ही व्यक्तीच्या पलीकडील एक सामूहिक शक्ती आहे. लेखक हीच सामूहिकता आपल्या शब्दांतून प्रतिबिंबित करतो. तो समाजातील वास्तव अनुभवतो, त्याचे अर्थ लावतो आणि त्यावर भाष्य करून समाजाच्या आत्मस्मृतीचा भाग बनतो. म्हणूनच प्रत्येक युगाचा लेखक त्या काळाच्या सामाजिक इतिहासाचा जिवंत साक्षी असतो. त्याची लेखणी काळाला दिशा देते आणि समाजाला अंतर्मुख करते.

भारतीय समाजाच्या संदर्भात पाहता, लेखन हे केवळ अभिव्यक्तीचे साधन नव्हते, तर सामाजिक संवाद आणि परिवर्तनाचे शक्तिशाली माध्यम राहिले आहे. संतकाव्याची परंपरा असो किंवा सुधारक चळवळीतील लेखन, भारतातील लेखकाने नेहमी सामाजिक जबाबदारी स्वीकारली आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्र्वर, संत कबीर यांनी शब्दांच्या माध्यमातून समतेचा आणि मानवतेचा संदेश दिला. पुढे राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, प्रबोधनकार ठाकरे, प्रेमचंद, शरतचंद्र, आचार्य अत्रे, अण्णाभाऊ साठे यांसारख्या लेखकांनी आपल्या काळातील विषमता, जातिभेद, शोषण आणि अन्याय याविरुद्ध लेखणी उचलली. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे तर, हे लेखक 'सामाजिक बदलाचे शिल्पकार' होते, जे समाजातील मूल्यव्यवस्थेला आव्हान देऊन नवी जाणीव निर्माण करीत होते.

लेखन ही समाजातील सांस्कृतिक भांडवलाची निर्मिती असते. पिएर बोर्द्यू यांनी "Cultural Capital' (सांस्कृतिक भांडवल) या संकल्पनेतून सांगितले की, ज्ञान, भाषा, अभिरुची, आणि प्रतीकात्मक मूल्ये ही समाजातील सत्ता-संबंध ठरवतात. लेखक हाच या सांस्कृतिक भांडवलाचा निर्माता असतो. त्याच्या लेखनातून नवे शब्द, नवी अर्थसृष्टी आणि नवे विचार उदयाला येतात. जेव्हा लेखक समाजातील वंचित, शोषित, अल्पसंख्याक वा उपेक्षित घटकांचा आवाज बनतो, तेव्हा तो समाजातील सत्ता-संबंधांमध्ये असंतुलन दाखवतो आणि न्याय्य रचनेसाठी संघर्ष करतो. म्हणून लेखक हा केवळ सर्जक नसतो, तर सामाजिक न्यायाचा वाहक असतो.

आधुनिक काळातही लेखनाचे स्वरूप बदलले असले तरी त्याची सामाजिक जबाबदारी कायम आहे. डिजिटल माध्यम, सोशल मीडिया, ब्लॉग, ई-पत्रिका यामुळे अभिव्यक्तीची क्षेत्रे विस्तारली आहेत, पण लेखकाचे काम तितकेच कठीण झाले आहे. कारण माहितीचा ओघ, दिशाभूल आणि भावनिक ध्रुवीकरण या नव्या आव्हानांनी लेखकाच्या स्वातंत्र्यावर नवे प्रश्र्न निर्माण केले आहेत. समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट मार्क्युसे यांनी "Repressive Tolerance' (दमनकारी सहिष्णुता) या संकल्पनेद्वारे सांगितले होते की, आधुनिक समाजात स्वातंत्र्य दिले जाते पण त्याच स्वातंत्र्यातून नियंत्रणही ठेवले जाते. आजच्या काळातील लेखक या नियंत्रणाविरुद्ध, मतस्वातंत्र्याच्या आणि विवेकाच्या बाजूने उभा राहणे आवश्यक आहे. कारण लेखकाचे मौन हे सत्तेचे बळ बनते, तर त्याचा उच्चार समाजाच्या विवेकाचे द्योतक ठरतो.

भारतीय समाजात लेखक हा केवळ साहित्यिक नसून तो समाजकारणी, शिक्षक, विचारवंत आणि चळवळीकर्मीही राहिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन हे केवळ कायदेपंडिताचे नव्हे, तर समाजशास्त्रीय चिंतनाचे प्रतिक आहे. त्यांच्या लिखाणाने वंचित समाजाला आत्मसन्मान दिला आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखवला. त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठे यांनी लोककलेच्या माध्यमातून सामाजिक वास्तव मांडले; त्यांचे लेखन समाजशास्त्रातील 'लोकसंस्कृतीचे समाजशास्त्र' या संकल्पनेला अधोरेखित करते. अशा लेखकांचे लेखन म्हणजे लोकसंस्कृतीचा आवाज आहे, जो शास्त्रीय आणि लोकजीवनाच्या मधोमध उभा आहे.

लेखक समाजाला केवळ विचार देत नाही, तर विचार करण्याची पद्धत घडवतो. त्याच्या लेखनामुळे वाचकांमध्ये सामाजिक भान निर्माण होते. समाजशास्त्रज्ञ अँथनी गिडन्स यांनी 'ठशषश्रशुळींळीूं' म्हणजेच आत्मपरीक्षणात्मक समाज ही संकल्पना मांडली. लेखक हे आत्मपरीक्षण शक्य करतो. तो समाजाला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी देतो. म्हणूनच लेखन हे समाजाच्या आरशासारखे असते; परंतु हा आरसा फक्त वास्तव दाखवत नाही, तर समाज कसा असावा याचाही विचार करायला लावतो. लेखकाची लेखणी समाजाच्या अंतःकरणात उतरते, प्रश्र्न विचारते आणि कधी कधी विद्रोह घडवते.

आजच्या काळात जेव्हा माहितीचा स्फोट झाला आहे, तेव्हा लेखकाची जबाबदारी अधिक वाढली आहे. तो सत्य आणि असत्य, विचार आणि अफवा, भावना आणि प्रचार यांच्यामधील सीमारेषा स्पष्ट करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या, लेखक समाजातील 'सांस्कृतिक मध्यस्थ' (Cultural Mediator) असतो, जो परंपरा आणि आधुनिकता, भावना आणि विवेक, स्थानिकता आणि जागतिकता यांचा संवाद घडवतो. जागतिकीकरणाच्या युगात स्थानिक भाषांतील लेखक समाजाच्या ओळखीचे रक्षण करत आहेत. मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, पाली अशा भारतीय भाषांतील लेखक समाजाच्या मुळांशी जोडलेले आहेत आणि ते 'स्थानिकतेचे समाजशास्त्र' घडवतात.

लेखकाचे व्यक्तिमत्व हे समाजातील वर्ग, लिंग, जात, धर्म, संस्कृती आणि राजकारणाशी घट्ट गुंफलेले असते. समाजशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांनी सांगितले की, साहित्य समाजाच्या आर्थिक अधिष्ठानाशी निगडित असते. लेखक त्या अधिष्ठानाचे प्रतिबिंब दाखवतो किंवा त्याविरुद्ध आवाज उठवतो. स्त्री लेखक, दलित लेखक, आदिवासी लेखक, अल्पसंख्याक लेखक यांनी त्यांच्या लेखनातून जो नवा दृष्टिकोन मांडला आहे, तो समाजशास्त्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या लेखनाने 'प्रभुत्वशाली कथनां'ना आव्हान दिले आणि समाजातील असमानता उघड केली. त्यामुळे लेखक केवळ सौंदर्याचा रचनाकार नाही, तर सामाजिक सत्याचा विश्र्लेषकही आहे.

राष्ट्रीय लेखक दिन हा केवळ उत्सव नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. या दिवशी आपण लेखकांना सन्मान देतो, पण त्याचबरोबर समाज म्हणून आपले वाचन, विचार आणि विवेक तपासतो. वाचकांशिवाय लेखक अपूर्ण आहे, आणि लेखकांशिवाय समाज मुक आहे. म्हणून हा दिवस लेखक-वाचक नात्याच्या संवेदनशीलतेचा दिवस आहे. प्रत्येक लेख, धडा, पुस्तक हे समाजाच्या संवादाचा भाग आहे, प्रत्येक शब्द हा परिवर्तनाचे बीज आहे.

आजच्या काळात जेव्हा अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येत आहेत, तेव्हा लेखकाने अधिक धैर्याने बोलणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या, लेखकाचे मौन हे 'सांस्कृतिक अधिपत्या'च्या (Cultural Hegemony) बळकटीस कारणीभूत ठरते, तर त्याचा उच्चार लोकशाहीच्या प्राणवायूसारखा असतो. म्हणूनच लेखकाचा सन्मान म्हणजे विचारस्वातंत्र्याचा सन्मान आहे.

एकूणच पाहता, राष्ट्रीय लेखक दिन हा केवळ साहित्याचा नव्हे, तर समाजाच्या आत्म्याचा उत्सव आहे. तो समाजाला स्मरण करून देतो की, लेखणी ही शस्त्र आहे, जी रक्त सांडत नाही, पण समाज जागवते. लेखक हा समाजाच्या विवेकाचा दीपस्तंभ आहे, जो काळोखातही प्रकाश देतो. समाजशास्त्रीय अर्थाने लेखक म्हणजे समाजाच्या चेतनेचा संरक्षक आहे. त्याचे लेखन म्हणजे समाजाच्या स्मृतींचे जतन आणि भविष्याचा आराखडा होय. त्यामुळे या दिवसाचे खरे औचित्य असे की, आपण प्रत्येकजण थोडासा 'लेखक' व्हावा, विचार करणारा, प्रश्र्न विचारणारा, आणि बदलाची बीजे पेरणारा. शब्दांमध्ये समाज जगतो, आणि लेखक त्याला अर्थ देतो.


राष्ट्रीय लेखक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...



डॉ. राजेंद्र बगाटे,
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. – ९९६०१०३५८२

# रुद्राक्ष धारण करण्यापूर्वी जाणून घ्या हे खास नियम, जाणून घ्या रुद्राक्ष धारण करण्याची पद्धत आणि महत्त्व

आजच्या काळात, प्रत्येकाला जीवनातील सर्व प्रकारच्या संकटातून मुक्ती हवी असते. अशा स्थितीत जर तुम्ही रुद्राक्ष धारण करण्याचा विचार करत असाल, तर सर्वप्रथम तुम्हाला रुद्राक्ष धारण करण्याचे नियम जाणून घ्या, रुद्राक्ष धारण करण्यापूर्वी कोणते नियम पाळले, तर तुम्हाला शुभ फळ मिळतील. शास्त्रानुसार हिंदू धर्मात रुद्राक्षाचे खूप महत्त्व आहे. असे मानले जाते की भगवान शंकराला रुद्राक्ष अत्यंत प्रिय आहे. या कारणामुळे जो व्यक्ती रुद्राक्ष धारण करतो, त्याला देवाचा विशेष आशीर्वाद मिळतो.



धार्मिक मान्यतेनुसार, रुद्राक्षाची उत्पत्ती भगवान शंकराच्या अश्रूंपासून झाली आहे. या कारणास्तव हिंदू धर्मात रुद्राक्षाला चमत्कारिक आणि अलौकिक मानले जाते. रुद्राक्ष एका मुखीपासून ते एकवीस मुखीपर्यंत आढळतात. ज्यांचे स्वत:चे वेगळे म हत्त्व आहे. नियमानुसार रुद्राक्ष धारण केल्यास सर्व प्रकारच्या संकटांपासून मुक्ती मिळते आणि कुंडलीतील ग्रहांची स्थितीही योग्य होते.

पौराणिक कथेत असा उल्लेख आहे की जेव्हा माता सतीने स्वत: अग्नीत प्रवेश करून आपल्या देहाचा त्याग केला, तेव्हा भगवान शंकराच्या डोळ्यातून अश्रू बाहेर पडले आणि ते अश्रू पृथ्वीवर अनेक ठिकाणी पडले आणि त्यातून निसर्गाला एक चमत्कारिक तत्व प्राप्त झाले. रुद्राक्षाचे रूप प्राप्त झाले. असे मानले जाते की जो व्यक्ती नियम आणि विधीनुसार रुद्राक्ष धारण करतो. त्याच्या जीवनातून दु:ख आणि वेदना हळूहळू दूर होऊ लागतात आणि भगवान शंकराचा आशीर्वाद राहतो.

**रुद्राक्ष धारण करण्याचे नियम**

ज्योतिषांच्या मते, जेव्हा कोणी रुद्राक्ष धारण करतो, तेव्हा त्याने प्रथम रुद्राक्ष मंत्र आणि रुद्राक्ष मूल मंत्राचा ९ वेळा जप करावा. याशिवाय हे लक्षात ठेवावे की रुद्राक्ष काढल्यानंतर तो पवित्र ठिकाणीच ठेवावा.

हिंदू धर्मात रुद्राक्ष हे तुळशीच्या जपमाळेसारखे पवित्र मानले जाते. त्यामुळे ते घातल्यानंतर मांस किंवा अल्कोहोलचे सेवन करू नका.

रुद्राक्ष कधीही स्मशानभूमीत नेऊ नये. याशिवाय नवजात बाळाच्या जन्माच्या वेळी किंवा ज्या ठिकाणी नवजात बाळाचा जन्म होतो, त्या ठिकाणी रुद्राक्ष धारण करणे टाळणे आवश्यक आहे.

आंघोळ केल्याशिवाय रुद्राक्षाला स्पर्श करू नये. आंघोळ करून शुद्ध झाल्यावरच रुद्राक्ष धारण करावा. यासोबतच 'ओम नम: शिवाय' या शिवमंत्राचा जप करत राहा.

लाल किंवा पिवळ्या धाग्यात रुद्राक्ष धारण करणे नेहमीच शुभ मानले जाते. काळ्या रंगाच्या धाग्यात कधीही घालू नका. याचा लोकांवर अशुभ परिणाम होतो.

रुद्राक्षाची जपमाळ धारण केल्यानंतर ती इतर कोणालाही अजिबात देऊ नका. यासोबतच दुसऱ्याने दिलेली रुद्राक्ष जपम ाळ धारण करू नये.

रुद्राक्ष नेहमी स्वच्छ ठेवा. मण्यांच्या छिद्रांमध्ये धूळ आणि घाण साचू शकते. त्यांना शक्य तितक्या वेळा स्वच्छ करा.

रुद्राक्षाचा धागा खराब झाला असेल किंवा खराब झाला असेल, तर तो बदलावा. साफ केल्यानंतर रुद्राक्ष गंगाजलाने धुवावे. त्यामुळे त्याची शुद्धता टिकून राहण्यास मदत होते.

रुद्राक्ष धारण करण्यापूर्वी त्याची शुद्धी आणि शुद्धीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. रुद्राक्ष सोमवार, महाशिवरात्री किंवा श्रावण महिन्यातील कोणत्याही दिवशी धारण करू शकतो. सर्वप्रथम चांदीच्या किंवा तांब्याच्या भांड्यात दूध, दही, मध, तूप आणि साखर घेऊन मिक्स करा. या मिश्रणात रुद्राक्षाला स्नान घालावा. आंघोळीनंतर पुन्हा शुद्ध पाणी आणि गंगाजलाने स्नान करून पूजास्थळी लाल कपड्यावर ठेवून गाईच्या तुपाचा दिवा लावून या मंत्राचा ५०१ किंवा ११०० वेळा जप करावा.

।।ॐ नम: शिवाय, या ॐ हूं नम: ।।

# कार्यकर्त्यांच्या निवडणूकीत गद्दारी खपवून घेणार नाही; अभय साळुंके यांचा सज्जड इशारा



**निलंगा/आयुब बागवान** : विधानसभा निवडणुकीत काही जणांनी न कळत तर काहींनी ठरवून गद्दारी केली. त्या सर्वांनी माफी दिली मात्र आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आहेत. पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे पैसे घामाच्या कष्टाचे आहेत. त्यांच्या निवडणुकीत जीव ओतून आम्ही काम करणार आहोत. त्यांना सन्मान मिळवून देण्यासाठी रक्ताचे पाणी करू मात्र या निवडणुकीत जर कोणी गद्दारी करण्याचा प्रयत्न केला तर खपवून घेणार नाही असा सज्जड इशारा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात दिला.

शुक्रवार (दि ३१) रोजी निलंगा येथील वृध्दावन मंगलकार्यालयात आयोजीत मेळाव्यात ते बोलत होते. व्यासपीठावर खा. डॉ. शिवाजीराव काळगे, जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख, प्रदेश सचिव श्रीशैल उटगे, प्रदेश सचिव कल्याण पाटील, जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, काँग्रेस नेते मल्लिकार्जुन मानकरी, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांब्रे, माजी जि.प उपाध्यक्षा जयश्रीताई पाटील, माजी जि प उपाध्यक्ष भगवानराव पाटील तळेगावकर जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, निलंगा तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील उजेडकर, देवणी तालुकाध्यक्ष ॲड अजित बेळकोणे, माजी प.स.सभापती अजित माने, माजी सभापती राम गायकवाड, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, शहराध्यक्ष अजित नाईकवाडे, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष प्रविण सूर्यवंशी, आंबादास जाधव, लाला पटेल, किशोर कारखाने, पंकज शेळके, शकील पटेल, रजनीकांत कांबळे, विलास सुर्यवंशी, अजित निंबाळकर, महेश देशमुख, महेश म्हेत्रे, सोनू डगवाले आदी उपस्थित होते. पुढे बोलताना अभय साळुंके म्हणाले निलंगा विधानसभेच्या आमदारांनी विकासाच्या नावाखाली मोठा भ्रष्टाचार केला. एकाच रस्त्यावर अनेकदा रस्ते करुन बील लाटण्याचे काम केले. आपल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना ग्रामपंचायत मध्ये काम करताना आडचण निर्माण केली. या आडचणीतून मुक्त करण्यासाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत काँग्रेसचा झेंडा फडकावणे आवश्यक असून तिन्ही तालुक्यातील सर्वच ठिकाणी काँग्रेस आपला झेंडा रोवेल असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रा. रमेश मदरसे, विठ्ठल पाटील, मिथुन दिवे, बालाजी गोमसाळे, गंगाधर चव्हाण, किरण पाटील, प्रमोद मरुरे, शाहीद लाला पटेल, बबलू जाधव, हाजी सराफ, दिलीप ढोबळे, बालाजी वळसांगवीकर, सुतेज माने, बाळू पाटील, गिरीश पात्रे, मालबा घोणसे, गोविंद सुर्यवंशी, विकास पाटील, विलास कांबळे, धनाजी चांदुरे, राम भंडारे, संजय बिराजदार, पिराजी साबळे, शरद देशमुख, रमाताई टोंपे, किशोर टोंपे, सिराज देशमुख, अजगर अन्सारी, दत्ता देशमुख, पंडितराव रणखांब, मदन बिरादार बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड प्रविण सोळुंके, ॲड तिरुपती शिंदे, ॲड संदीप मोरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गद्दारांना पक्षात थारा नाही: बाळासाहेब देशमुख**

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पक्षातील गद्दारांचा शोध घेण्याच्या सूचना पक्षाला दिल्या असून पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांना पक्षात उमेदवारी तर सोडा साधा थारा मिळणार नाही अशी स्पष्ट भूमिका जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख यांनी जाहीर करत शिफारशीवर उमेदवारी मिळणार नाही तर विजयी मिरीटवर उमेदवारी दिली जाणार असल्याचे जाहीर केले. तसेच जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या कामाचे कौतुक करत देशातील टॉप टेन जिल्हाध्यक्षामध्ये अभय साळुंके यांची गगणा होत असल्याचे त्यांनी देशमुख यांनी सांगितले.

**स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काँग्रेसचा झेंडा फडकणार :खा. डॉ. शिवाजीराव काळगे**

राज्य आणि केंद्र सरकारच्या फसव्या आश्र्वासनाला येथील जनता कंठाळून गेली असून शेतकरी, शेतमजूर व तरुण बेरोजगारांना वाऱ्यावर सोडणाऱ्या भाजप सरकारला जनता अद्दल घडविणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत सर्वच पातळीवर काँग्रेसचा झेंडा फडकणार असा विश्र्वास खासदार डॉ शिवाजीराव काळगे यांनी व्यक्त केला.

# राजा नारायणलाल लाहोटी स्कूलमध्ये सरदार पटेल यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी




**लातूर/प्रतिनिधी** : येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस प्राचार्य कर्नल श्रीनुवासुलू यांच्या शुभहस्ते पुष्पहार घालून राष्ट्रीय एकता दिवस प्रार्थना सभेची सुरुवात करण्यात आली. इयत्ता तिसरी वर्गातील विद्यार्थी प्रज्वल वलमपल्ले याने सरदार पटेल यांच्या वेशभूषेत ''लोहपुरूष'' हा एकपात्री संवाद सादर केला तर माही तोष्णीवाल या विद्यार्थिनीने आपल्या मनोगतातून सरदार वल्लभभाई पटेल यांचा जीवन प्रवास वर्णन केले तर संगीत चमूने एक भारत श्रेष्ठ भारत या गीताद्वारे उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या औचीत्यावर राष्ट्रीय एकतेची शपथ घेऊन विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक कर्मचारी वृंद यांनी राष्ट्राची अखंडता, सर्वभौमतेप्रति सर्वस्व अर्पण करण्याचा संकल्प घेतला.

२१ व्या शतकातील भारत जागतिक शक्ती म्हणून उभा टाकत असताना आपल्याला सरदार पटेलांची विचार शृंखला मार्गदर्शक ठरते. त्यांनी एक संदेश दिला देश प्रथम व्यक्ती नंतर याची अंमलबजावणी सर्वांनी करणे गरजेची आहे'' असे विचार प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुंज राठी या विद्यार्थाने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुलसचिव प्रवीण शिवणगीकर, सेल्वी अरुल, कॅप्तन बी के भालेराव, संदीप केंद्रे, राणी अमले, मनीषा नाडे, देवयानी देशपांडे, वर्ष खुन्ठेगावे, अरुण भोगे, विकास बनसोडे, ज्ञानेश्वर गोसावी, तुषार यवनगे यांनी योगदान दिले.

# चाळीशीनंतर वजन कमी करण्याच्या टिप्स!



: चाळीशीनंतर जास्त जोर लावून व्यायाम करणे आणि जास्त वेळ चालणारे कार्डिओ सेशन फायदेशीर वाटण्यापेक्षा जास्त त्रासदायक, किंवा थकवा देणारे वाटू शकतात. पण, फिटनेस प्रशिक्षक भाविका पटेल सांगतात की, या वयोगटातील लोकांना वजन कमी करण्यासाठी तासनतास ट्रेडमिलवर किंवा सांध्यावर ताण येणाऱ्या दिनचर्येचा वापर करण्याची गरज नाही. प्रशिक्षक भाविका पटेल यांनी अलीकडील त्यांच्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये चाळीशीनंतर गुडघे आणि सांध्याचे संरक्षण आणि कॅलरी बर्न केली पाहिजे यासाठी ४ उपाय शेअर केले आहेत.

इनक्लाइन वॉकिंग – उतार असलेल्या ट्रेडमिलवर चाला. ट्रेडमिलच्या इनक्लाइन ८ ते १५ टक्के पर्यंत वाढवा आणि वेगाने चाला. हे तुमच्या गुडघ्यांसाठी सौम्य असते, गुडघ्यांवर कमी ताण देतो आणि मांड्या, पोटरीचे स्नायू यांना चांगला व्यायाम होतो.

ट्रेडमिल इंटरव्हल्स – सगळ्यात आधी ३० ते ६० सेकंद धावा. मग १ ते २ मिनिटे हळू चाला आणि जॉगिंग करा. यामुळे तुमच्या हृदयाची ठोका वाढलेला राहतो आणि ट्रेडमिलवर धावल्यामुळे शरीरावरचा ताण आणि झीज कमी होते.

साईड शफल्स – साईड शफल्स म्हणजे सरळ पुढे न जाता बाजूने चालत जाणे. यामुळे तुमच्या कंबर आणि नितंब किंवा हीप्सचे स्नायू मजबूत होतात. हा व्यायाम चालताना किंवा धावताना शरीराचं संतुलन सुधारतो. यादरम्यान थोडी जळजळ जाणवते.

वॉकिंग लंग्स – ट्रेडमिलची गती ०.५ ते १.० सेट करा. त्यानंतर ट्रेडमिलवर मोठी पावले टाकत चालायचं; म्हणजे प्रत्येक वेळी एक पाय पुढे घेऊन गुडघा वाकवायचा. हातांच्या आधारासाठी ट्रेडमिलचे हँडल धरावे, म्हणजे गुडघ्यांवर ताण कमी पडतो. त्यामुळे हा व्यायाम मांड्या आणि नितंब किंवा हीप्स यांना चांगला व्यायाम देतो आणि शरीराच्या खालच्या भागाला टोन करतो. जर तुम्ही योग्य अन्नाचे सेवन केले तर हे व्यायाम तुम्हाला कॅलरीज बर्न करण्यास आणि चरबी कमी करण्यास मदत करू शकतात.

बाजारातील पनीर खरं की खोटं कसं ओळखावं?
भेसळयुक्त पनीर
मुळे होतात 'हे' दोन गंभीर आजार

चाळीशीनंतर वजन कमी करण्याचा जबरदस्त उपाय

याबद्दल द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देत टोन ३० पिलेट्समधील एमपीटी, फिटनेस आणि पिलेट्स तज्ज्ञ डॉक्टर वाजल्ला श्रावणी म्हणाल्या की,


चाळीशीनंतर अशा व्यायामावर किंवा हालचालींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे; ज्या सांध्यासाठी सौम्य आणि हृदय गती आणि शरीरातील ऊर्जा वाढवतात.

फास्ट चालणे, पोहणे, एका जागी स्थिर ठेवलेल्या सायकलवर व्यायाम करणे, रेझिस्टन्स बँड ट्रेनिंग, स्क्वॅट्स किंवा पुश-अप्स सारख्या बॉडीवेट हालचालींसारखे व्यायाम या वयोगटासाठी उत्कृष्ट पर्याय आहेत. या क्रियाकलापांमुळे कॅलरी बर्न होण्यास प्रोत्साहन मिळते आणि गुडघे, कंबर किंवा पाठीवर जास्त ताण न पडता स्नायूंची सहनशक्ती सुद्धा सुधारते.

इनक्लाईन वॉकिंग, साईड शफल्स आणि वॉकिंग लंग्ज हे व्यायाम चरबी कमी करण्यास कशी मदत करतात?

डॉक्टर श्रावणी यांच्या मते,

इनक्लाईन वॉकिंग ग्लूट्स, हॅमस्ट्रिंग्स आणि कॅव्हल्स (पोटरी) सारखे स्नायू काम करण्यात व्यस्थ राहतात. यामुळे हा व्यायाम करताना हृदयाचा ठोका वाढतो आणि चरबी कमी होण्यास मदत होते.साईड शफल्स या व्यायामात मांड्यांच्या आतील आणि बाहेरील स्नायू सक्रिय होतात. कंबरेची हालचाल आणि शरीराचा तोल सुधारतो; जे वाढत्या वयानुसार महत्वाचा असतो.



वॉकिंग लंग्स सारखे व्यायाम शरीरातील अनेक स्नायूंवर काम करतात; ज्यामध्ये क्वाड्रिसेप्स (जांघेच्या पुढचे स्नायू), हॅमस्ट्रिंग्स (जांघेच्या मागचे स्नायू), ग्लूट्स (नितंब किंवा हीप्स) आणि पोटाचे स्नायू (कोर) यांचा समावेश असतो. या व्यायामुळे स्नायू मजबूत होतात आणि स्नायूंचे प्रमाण देखील वाढते. त्यामुळे ऊर्जेचा वापर होण्याचा वेग वाढतो. हे व्यायाम हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी फायद्यांबरोबर ताकद वाढवतात; ज्यामुळे जास्त मेहनत न घेता चरबी कमी करण्यासाठी मदत होते.

हेही वाचा
कानातील मळ आणि धुळीने माखलेले हेडफफोन्स कसे स्वच्छ करायचे? 'या' पाहा सोप्या टिप्स; नव्यासारखे दिसतील इअरबड्स
वजन कमी करताना आहार किती महत्त्वाचा असतो?

डॉक्टर श्रावणी म्हणतात चाळीशीनंतर लोकांचे चयापचय नैसर्गिकरित्या मंदावू लागते. त्यामुळे व्यायामाइतकीच आहाराची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची असते. त्यामुळे त्यांनी आहारात संपूर्ण अन्न, कमी चरबीचे प्रोटीन, फायबरयुक्त भाज्या आणि निरोगी फॅट्स असणाऱ्या पदार्थांना प्राधान्य दिल्याने संतुलित पोषण तर मिळेलच आणि तुम्हाला पोट भरल्यासारखे देखील वाटेल. यामुळे अन्नावर नियंत्रण राहते आणि जास्त प्रमाणात खावंसं वाटत नाही; जे वजन कमी करण्यात एक सामान्य अडथळा ठरत असते. पण, हायड्रेटेड राहणे,प्रक्रिया केलेले अन्न आणि रिफाइंड साखरेचे सेवन मर्यादित करणे देखील महत्त्वाचे आहे; ज्यामुळे तुमची ऊर्जा क्रॅश होणार नाही आणि तुमचे वजन देखील वाढणार नाही.

# अमेरिकाची मैत्री चीननंतर भारताशोबत?

आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणता देश 'झुकतो' वा 'लवचिकता' दाखवतो यावर उभयपक्षी किंवा बहु पक्षीय 'मैत्री' ठरते. चीननंतर भारत किती लवचिकता दाखवेल, हे येत्या काळात दिसेल.

अमेरिका आणि चीनमध्ये व्यापार करार झाला आहे. त्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. या कराराबद्दल 'बक्षिसा'दाखल ट्रम्प यांनी चीनवरील आयात शुल्क ५७ टक्क्यांवरून ४७ टक्के केले. जगातील दोन आर्थिक महासत्तांमधील हा व्यापार करार असल्याने सर्व जगाचे लक्ष त्याकडे लागले होते. जवळपास आठवडाभर ट्रम्प आशियाच्या दौर्यावर होते. त्याची सांगता चीनबरोबरच्या कराराने त्यांनी केली. त्याआधी जपान व दक्षिण कोरियाशीही त्यांनी व्यापार विषयक करार केले. 'भारताबरोबरही लवकरच व्यापार करार होईल' अशी घोषणा ट्रम्प यांनी दक्षिण कोरियात केली. भारताच्या परराष्ट्र खात्याने किंवा व्यापार खात्याने त्यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. ट्रम्प यांचा स्वभाव लक्षात घेता त्यांच्या कोणत्याही विधानावर लगेच प्रतिक्रिया देणे योग्य नसते हे आतापर्यंत जगाच्या लक्षात आले आहे. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. भारत-पाकिस्तान संघर्ष आपण थांबवला, या दाव्याचाही त्यांनी पुनरुच्चार केला. द्विपक्षीय व्यापार कराराबाबत अमेरिकेशी भारताची चर्चा सुरु आहे. त्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांचे विधान आले आहे. ट्रम्प यांनी आशियाई देशांशी व्यापार करार करताना अमेरिकेचे हित जपले आहे, हा मुद्दा महत्त्वाचा आहे.

दुर्मिळ खनिजे महत्त्वाची

सानाए ताकाइची यांच्या रूपाने जपानच्या पंतप्रधानपदी प्रथमच महिलेची निवड झाली आहे. टोकियोच्या भेटीत ट्रम्प यांनी ताकाइची यांची मुक्त कंठाने प्रशंसा केली.





माजी पंतप्रधान शिन्झो आबे यांच्या त्या वारस मानल्या जातात. आबे व ट्रम्प यांची वैयक्तिक मैत्री होती. हा संदर्भ येथे महत्त्वाचा आहे. जपान अमेरिकेस 'दुर्मिळ खनिजे' पुरवणार आहे. विविध क्षेत्रात जपानी कंपन्या सुमारे ४०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक अमेरिकेत करणार आहेत. जपानचा संरक्षणावरील खर्च वाढवण्याचे ताकाइची यांनी ठरवले आहे. बहुतेक संरक्षण सामग्री त्या अमेरिकेकडून घेतील असे दिसते. जपानवर ट्रम्प यांनी १५ टक्के 'प्रत्युत्तर शुल्क' लादले होते. ते कमी किंवा पूर्ण रद्द व्हावे या हेतूने जपानने अमेरिकेशी करार केला हे जाणवते. तीच स्थिती दक्षिण कोरियाची. आशिया-प्रशांत महासागर आर्थिक सहकार्य परिषदेच्या निमित्ताने ट्रम्प दक्षिण कोरियात आले होते. त्याच वेळी दोन्ही देशांत झालेल्या व्यापार करारानुसार दक्षिण कोरिया अमेरिकेत २०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे, शिवाय जहाज बांधणी क्षेत्रात १५० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करेल. प्रत्युत्तर शुल्कातून वाचण्यासाठी दक्षिण कोरियास हा करार करणे भाग होते. या दोन्ही करारांतून ट्रम्प यांनी चीनचे अध्यक्ष झी जिनपिंग यांना संदेश दिला. चीनबरोबरचा 'दुर्मिळ खनिजा'चा वाद संपल्याचे ट्रम्प यांनी जाहीर केले. चीन अमेरिकेकडून सोयाबीन खरेदी करेल, तसेच दुर्मिळ खनिजांचा पुरवठाही पूर्ववत करत राहील. विजेवर चालणारी वाहने, संगणक यापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत दुर्मिळ खनिजे महत्त्वाची आहेत. जरी चीन एक आर्थिक महासत्ता असली तरी अमेरिकेबरोबरचा व्यापार कमी होणे त्या देशाला परवडणार नाही, हे या करारातून दिसले. या कराराची मुदत एकच वर्ष आहे. या घडामोडी बघता भारत काय करणार हा प्रश्न येतो. द्विपक्षीय व्यापार कराराच्या संदर्भात अमेरिकेशी भारताच्या चर्चेच्या पाच फेर्या झाल्या आहेत. भारताने या पूर्वीच अमेरिकेतून येणार्या अनेक वस्तूंवरील आयात शुल्क कमी केले आहे. दुग्ध व्यवसाय व कृषी क्षेत्र अमेरिकेसाठी खुले करावे ही ट्रम्प यांची मागणी आहे. त्यावर चर्चा अडली आहे. प्रत्युत्तर शुल्कामुळे भारताच्या कोळंबीच्या निर्यातीवर परिणाम झाला आहे. वस्त्रोद्योगालाही फटका बसला आहे. चीनचे अध्यक्ष झी यांच्यावर प्रसंगी शिवराळ टीका करणार्या ट्रम्प यांनी या करारानंतर 'एका शक्तीशाली देशाचा उत्तम नेता' अशी प्रशंसाही केली. आपल्या सोयीनुसार ते टीका व स्तुती करतात. त्यामुळे त्यांनी मोदी यांची केलेली प्रशंसा गंभीरपणे घेता येत नाही. आपल्या मागण्या ते भारतास किती प्रमाणात मान्य करायला लावतात, यावर द्विपक्षीय कराराचे भवितव्य अवलंबून आहे.

## पौष्टिक खा, फिट राहा! — डॉक्टर टीप्स

नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...



स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.

(**क्रमशः**)




## विनोद

राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?
Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
– कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया : ।।

अर्थ – जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत






# दाऊद दहशतवादी नाही, त्याने देश विघातक कृत्य केलेली नाहीतः ममत कुलकर्णी

**मुंबई**–नव्वदच्या दशकातली ग्लॅमरस अभिनेत्री ममता कुलकर्णी नेहमीच वादाच्या भोवऱ्यात दिसलीय. तिचं आयुष्य घोटाळे, अंडरवर्ल्डशी संबंध असल्याच्या अफवांम ुळे चर्चेत आलेलं. पडद्यावर साकारलेल्या बोल्ड भूमिका आणि स्क्रीन प्रेजेंसमुळे ममता कुलकर्णी अल्पावधीच प्रसिद्धीझोतात आली. पण, जेवढ्या लवकर ती प्रसिद्धीझोतात आली, तशीच अंडरवर्ल्डशी संबंध आणि एका कुख्यात ड्रग केसमध्ये नाव आल्यामुळे तिची प्रसिद्धी फिकी पडली. अशातच आता पुन्हा एकदा ममता कुलकर्णी आपल्या वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. त्यासाठी कारण ठरतंय तिनं केलेलं वक्तव्य. ममता कुलकर्णी म्हणाली आहे की, ''दाऊद इब्राहिम दहशतवादी नाही...''

ममता कुलकर्णीनं कित्येक वर्षानंतर अंडरवर्ल्डच्या सर्वात मोठ्या डॉनचं नाव घेऊन एक वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. ममता कुलकर्णी माध्यमांशी बोल-ताना म्हणाली की, ''दाऊद इब्राहिम दहशतवादी नाही... आणि त्यानं बॉम्बस्फोटही घडवून आणलेले नाहीत... बॉम्बस्फोटासारख्या घटनांमध्ये त्याचं नाव कधीच आलेलं नाही. माध्यमं आणि काही राजकीय शक्ती यांनी कट रचून त्याला बदनाम केलंय... एखादी व्यक्ती गुन्हेगार असण्यासाठी तिच्यावर आरोप सिद्ध होणं गरजेचं असतं, फक्त प्रचार केल्यानं कुणीच गुन्हे- गार ठरत












नाही...''

''दाऊदशी माझं काहीच देणं-घेणं नाही...''

ममता कुलकर्णी पुढे बोलताना म्हणाली की, ''दाऊदशी माझं काहीच देणंघेणं नाही... कुणा एखाद्याचं नाव नक्कीच होतं... पण तुम्हीच पाहा, त्यानं बॉम्बस्फोट घडवून आणलेला नाही. देश विघातक कृत्य केलेली नाहीत, ज्याच्यासोबत माझं नाव जोडलं गेलंय.... त्यानं कधीही बॉम्ब ब्ल- ास्ट केलेला नाही...

मी दाऊदला उभ्या आयुष्यात कधीच भेटेलेल नाही...''

अंडरवर्ल्ड डॉनशी संबंध अन् ड्रग केसमध्ये आलेलं नाव...


ममता कुलकर्णीच्या आयुष्यातील सर्वात चर्चेत असलेला एक पैलू म्हणजे, अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनशी अस-लेले तिचे कथित संबंध. १९९८ मध्ये, राजनसोबतच्या तिच्या संबंधांच्या अफवा पसरू लागल्या आणि त्या माध्यमांमध्ये चर्चेचा विषय बनल्या. 'चायना गेट'च्या सेटवर झालेल्या घटनेनंतर ममता कुलकर्णीचे अंडरवर्ल्डशी असलेले संबंध अधिक तीव्र झाले. राजकुमार संतोषीशी झालेल्या मतभेदानंतर तिला चित्रपटातून काढून टाकण्यात आलं. राजनकडून धमक्या मिळाल्यानंतर पुन्हा ममता कुलकर्णीला सिनेमात घेतल्याचं बोललं जातंय. चित्रपटाच्या अपयशामुळे तिला मोठा धक्का बसला आणि तिनं राजकुमार संतोषीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला.

ममता कुलकर्णी कोण?

१९९० च्या दशकात 'करण अर्जुन', 'कृष्णा', 'बाजी' आणि 'क्रांतिवीर' सारख्या सुपरहिट चित्रपटांमधून स्टारडम मिळवणाऱ्या ममता कुलकर्णीला 'इट गर्ल' म्हणून ओळखलं जायचं. अल्प-ावधीतच कमालीचं स्टारडम मिळवूनही १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात ती अचानक गायब झाली. २०१६ मध्ये, केनियामध्ये तिचा कथित पती विक्रम गोस्वामी (विक्की) याला अटक करण्यात आली, तेव्हा तिचं नाव ड्रग्ज तस्करी प्रकरणात समोर आलं. छोटा राजन आणि दाऊद गँगमधील शत्रुत्वात सहभागी असल्याचा आरोपही विक्कीवर असल्यानं दाऊदचं नावही यात आलं. पण, ममतानं हे आरोप सातत्यानं नाकारलेत. २०२५ च्या कुंभमेळ्यापूर्वी ती भारतात परतली. तिच्या मते, तिनं १२ वर्ष तपश्चर्या केली. कुंभमेळ्यात तिनं संन्यास घेतला आणि 'म ाई ममता नंद गिरी' या नावानं आध्यात्मिक जीवन स्वीकारलं.

# संजय मिश्रांनी ६२ व्या वर्षी महिमा चौधरीशी केला विवाह?





मुंबई–बॉलिवूड अभिनेत्री महिमा चौधरी ही पुन्हा एकदा सिनेविश्वात सक्रिय झाली आहे. सध्या सोशल मीडियावर महिमा चौधरीचा एका व्हिडीओ जोरात व्हायरल होत असून यामध्ये ती ६२ वर्षाच्या संजय मिश्रांसोबत दिसत आहे. या व्हिडीओमध्ये संजय मिश्रा आणि महिमा चौधरी हे दोघंपण नवविवाहीत दांपत्यासारखे दिसत आहेत. त्यामुळे मध्यम वयाच्या महिमाने साठी पार केलेल्या संजय मिश्रांसोबत लग्न केले असल्याची चर्चा माध्यमांवर होताना दिसत होती. मात्र आता या व्हिडीओम ागील सत्य समोर आले आहे.

अभिनेत्री महिमा चौधरी आणि संजय मिश्रा लग्नाच्या पोशाखात असलेला हा व्हिडीओ त्यांच्या आगामी चित्रपटाचा पहिला लूक होता. 'दुर्लभ प्रसाद की दुसरी शादी' या सिद्धांत राज सिंह दिग्दर्शित चित्रपटाच्या प्रम ोशनसाठी त्यांनी हा लूक केला होता. पण व्हिडीओमुळे सुरुवातीला प्रेक्षकांच्या मनात वेगळ्याच चर्चेने जागा घेतली होती.

महिमा चौधरीचे लग्न २००६ मध्ये बॉबी मुखर्जीशी झाले होते. त्यानंतर २००७ मध्ये त्यांना मुलगी झाली. मुलीच्या जन्मानंतर सहा वर्षांनी २०१३ मध्ये ते वेगळे झाले. तर संजय मिश्रा यांचे दोनदा लग्न झाले आहे. पहिल्यांदा त्यांनी रोशनी अचरेजाशी लग्न केले होते. मात्र काही दिवसांनी रोशनी सोबत विभक्त होऊन किरण मिश्रासोबत त्यांनी दुसरे लग्न केले. दरम्यान, व्हायरल झालेल्या व्हिडीओमुळे मिश्रा यांनी महिमा चौधरीसोबत लग्न केले असल्याची चर्चा रंगली होती.


महिमा चौधरी 'परदेस', 'धत्रडकन' आणि 'इमरजन्सी' यांसारख्या चित्रपटांमधील तिच्या भूमिकांसाठी ओळखली जाते. नुकतीच ती नेटफ्लिक्सवरील 'नादानीयां' या चित्रपटात दिसली होती. संजय मिश्रा हे लोकप्रिय अभिनेते असून 'मसान' सिनेमातली त्यांची भूमिका गाजली. त्यांनी नुकतेच उमेश शुक्ला दिग्दर्शित 'हीर एक्सप्रेस' या चित्रपटात काम केले आहे.

# भाजपा नेत्याची परेश रावल यांच्या द ताज स्टोरी चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी; कारण काय?

मुंबई २९ ऑक्टोबर (पीएसआय) बॉलिवूडचे अभिनेते परेश रावल यांच्या 'द ताज स्टोरी' चित्रपटाला विरोध होताना दिसत आहे. चित्रपटाच्या विरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. चित्रपटात ऐतिहासिक बाबींची मोडतोड करण्यात आल्याचा आरोप वकील शकील अब्बास यांनी केला आहे. दुसऱ्या बाजूला आता भाजपामधीलच एका नेत्यानेही चित्रपटाला विरोध केला असून यावर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

भाजपा नेत्याकडून विरोध होण्याचे कारण काय?

अयोध्येतील भाजपा नेते आणि प्रवक्ते रजनीश सिंह यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि सेन्सॉर बोर्डाकडे लेखी तक्रार दाखल करून चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली. सदर चित्रपट त्यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या विषयावर आधारित असल्याचा दावा त्यांनी केला आहे.




रजनीश सिंह यांनी २०२२ साली अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठात याचिका दाखल करून ताजम हाल मधील बंद असलेल्या २२ खोल्याचे कुलूप उघडण्याची मागणी केली होती. ताजमहालच्या जागी मुळ मंदिर होते, असा दावा याचिकेत करण्यात आलेला आहे. याचिकेत म्हटले आहे की, भारतीय पुरा-तत्त्व विभागाची एक समिती स्थापन करावी आणि १७ व्या शतकातील ताजमहलची तपासणी करण्यात यावी. मात्र उच्च न्यायालयाने मे २०२२ साली सदर याचिका फेटाळून लावली होती.

माझ्या याचिकेचा चित्रपटात उल्लेख

रजनीश सिंह यांनी केंद्र सरकार आणि सेन्सॉर बोर्डाला लिहिलेल्या पत्रात म्हटले की, मी ताजमहलमधील २२ खोल्या उघडण्याची जनहीत याचिका दाखल केली होती. माझा उद्देश इतकाच होता की, यामध्ये पारदर्शकता असावी आणि ऐतिहासिक तथ्य काय आहेत? ते सर्वासम ोर यावेत. मला कळले की, द ताज स्टोरी चित्रपट माझ्या याचिकेवर बेतलेला आहे. चित्रपटाच्या पोस्टर, प्रचाराचे साहित्य आणि चित्रपटाच्या कथेमध्ये हा चित्रपट न्यायालयीन याचिकेवर बेतलेला असल्याचे म्हटले आहे. चित्रपटाचा हा दावा दिशाभूल करणारा आहे. तसेच माझ्या बौद्धिक आणि कायदेशीर हक्कांचे उल्लंघन आहे. तसेच हे करण्यापूर्वी माझी परवानगी घेतलेली नाही, असाही आरोप त्यांनी केला.

रजनीश सिंह पुढे म्हणाले की, अशा चित्रपटामुळे न्यायालयीन प्रक्रियेवर तर परिणाम होईलच त्याशिवाय सामाजिक आणि धार्मिक तणावही निर्माण होऊ शकतो.'' त्यांनी सेन्सॉर प्रक्रियेला तात्काळ स्थगिती देण्याची आणि द ताज स्टोरीच्या सार्वजनिक प्रदर्शनावर बंदी आणण्याची मागणी केली. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत चित्रपटाचे प्रमोशन आणि प्रदर्शनावर बंदी घालावी, असेही भाजप नेत्याने म्हटले आहे.'द ताज स्टोरी' हा तुषार अमरीश गोयल लिखित आणि दिग्दर्शित कोर्टरूम ड्रामा आहे. यात परेश रावल, झाकीर हुसेन, अमृता खानविलकर, नमित दास आणि स्नेहा वाघ यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# द ताज स्टोरी वादात! हायकोर्टाचा तातडीच्या सुनावणीस नकार




नवी दिल्ली–अभिनेते परेश रावल यांची प्रमुख भूमिका असलेला आगामी चित्रपट मद ताज स्टोरीफ प्रदर्शनापूर्वीच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या चित्रपटाच्या आशयामुळे आणि त्याला सेन्सॉर बोर्डाने दिलेल्या प्रमाणपत्राविरोधात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर (झ्ख्) तातडीने सुनावणी घेण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. ३१ ऑक्टोबर रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे, मात्र ट्रेलर रिलीज होताच या वादाला तोंड फुटले आहे.

नेमकी याचिका कशासाठी?

मद ताज स्टोरीफ चित्रपटाच्या प्रदर्शनावर त्वरित बंदी घालावी आणि सेन्सॉर बोर्डाने (सीबीएफसी) दिलेले प्रमाणपत्र रद्द करावे, अशी मागणी करणारी ही जनहित याचिका होती. यासंदर्भात त्वरित सुनावणी व्हावी, अशी विनंती याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला केली. मात्र, न्यायालयाने या केसमध्ये तातडीने सुनावणी करण्याची कोणतीही आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे, ही याचिका त्वरित सुनावणीसाठी यादीत (लिस्टमधील) समाविष्ट केली जाणार नाही, असा निर्णय न्यायालयाने दिला.

इतिहासाची चुकीची मांडणी केल्याचा आरोप

वकील शकील अब्दुल्ला यांनी दिल्ली उच्च न्यायालयात ही जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी युक्तिवाद करताना सांगितले की, चित्रपटात इतिहासाची चुकीच्या पद्धतीने मांडणी करण्यात आली आहे. ज्यामुळे समाजात आणि दोन समुदायांमध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार आणि सेन्सॉर बोर्डाला चित्रपटाच्या संभाव्य वाईट परिणाम ांची कल्पना असूनही त्यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही, असा आरोपही याचिकाकर्त्याने केला आहे.

याचिकाकर्त्यांची मागणी काय?

याचिकाकर्त्याने सेन्सॉर बोर्डाला चित्रपटाच्या प्रमाणपत्राची पुन्हा एकदा समीक्षा करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे. गरज पडल्यास चित्रपटाला मअडल्ट सर्टिफिकेटफ द्यावे किंवा काही आक्षेपार्ह दृश्ये वगळण्याचा आदेश द्यावा. तसेच, चित्रपटात ही कथा काल्पनिक असून ऐतिहासिक तथ्यांवर आधारित असल्याचा दावा करत नाही, असा मडिस्क्लेमरफ (अस्वीकरण) जोडण्याची सूचनाही याचिकेत केली आहे.

चित्रपटाची स्टारकास्ट आणि प्रदर्शनाची तारीख

या चित्रपटाचा ट्रेलर १६ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झाला होता आणि त्यानंतर लगेचच यावर वाद सुरू झाला. मद ताज स्टोरीफ या चित्रपटात परेश रावल यांच्यासोबत झकीर हुसेन, अमृता खानविलकर, स्नेहा वाघ आणि नमित दास यांसारखे कलाकार म हत्त्वाच्या भूमिकांमध्ये आहेत. सी.ए. सुरेश झा यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे, तर तुषार अम रीश गोयल यांनी लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. हा चित्रपट ३१ ऑक्टोबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. न्यायालयाच्या या निर्णयानंतर आता चित्रपट निर्धारित वेळेत प्रदर्शित होतो की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# कॅन्सरशी झुंजणाऱ्या मुलांसाठी विवेक ओबेरॉय बनला देवदूत

मुंबई –अभिनेता विवेक ओबेरॉय हा एक प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्यापैकी एक आहे, ज्याने त्याच्या कॉमिक टायमिंग आणि दमदार अभिनयामुळे अनेकांची मने जिंकली आहेत. गेल्या काही वर्षापासून विवेक हा त्याचा आगामी चित्रपट ममस्ती ४फमुळं चर्चेत आहे. याशिवाय विवेकचे अनेक प्रोजेक्ट्स आहेत, जे पाइ-पलाइनमध्ये आहेत. यामध्ये नितेश तिवारीचा बहुप्रतीक्षित मरामायणफ चित्रपटाचा देखील समावेश आहे. या चित्रपटामध्ये प्रमुख भूमिकेत रणबीर कपूर,फक्रेजीएफफ स्टार यश, सनी देओल आणि साई पल्लवी हे कलाकार दिसणार आहेत. मरामायणफमध्ये विवेक हा विभीषणाची भूमिका साकारणार आहे. आता या चित्रपटासाठी मिळा-लेली फी विवेक ओबेरॉयने दान केली आहे.

विवेक ओबेरॉय कॅन्सरशी झुंजणाऱ्या मुलांसाठी बनला देवदूत : विवेकने अलीकडेच मुलाखतीत खुलासा केला की, त्याने मरामायणफचे निर्माते नमित मल्होत्राला सांगितले की, त्याला पैसे नको आहेत. त्याला हे पैसे कर्करोगाशी झुंजणाऱ्या मुलांसाठी दान करायचे आहेत. त्यानंतर निर्मात्याला असेही सांगितले की, तो त्याच्याबरोबर काम करू इच्छितो आणि त्यांना पाठिंबा



देऊ इच्छितो कारण त्याला हा प्रोजेक्ट खूप आवडतो. त्याने म्हटले, मफमी नमितला सांगितले की, मला यासाठी एक पैसाही नको आहे, मी ते अशा कोणत्याही कारणासाठी दान करू इच्छितो. मला कर्करोगाशी झुंजणाऱ्या मुलांसाठी काहीतरी चांगले करायचे आहे.फफ

विवेक ओबेरॉयनं शेअर केला अनुभव : या मुलाखतीत विवेक ओबेरॉयनं राम ायणच्या कलाकारांबरोबर आणि क्रूसह काम करण्याचा अनुभवही शेअर केला. त्यानं सांगितलं, मफरामायण पौराणिक आहे की, ऐतिहासिक याबद्दल नेहमीच वादविवाद होतात. आम्हाला वाटते की ते ऐतिहासिक आहे आणि त्यावर काम करणे हा एक उत्तम अनुभव होता.फफ मी खूप आनंदी होतो आणि संपूर्ण क्रूसह काम करण्यास खूप मजा आली. नमित, नितेश, यश आणि रकुल प्रीत सिंग. माझे अजून काही दिवसांचे शूटिंग बाकी आहे.फफ दरम्यान नितेश तिवारी हे मरामायणफ हा चित्रपट २०२६ आणि २०२७ च्या दिव-ाळीमध्ये दोन भागात प्रदर्शित करणार आहेत. या चित्रपटामध्ये रणबीर कपूर श्रीराम, साई पल्लवी सीता, यश रावण आणि सनी देओल भगवान हनुमानाच्या भूमिकेत दिसणार



## उदगीर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समृद्ध लोकशाहीचा पाया रचला - सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**लातूर/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अंधारलेल्या समाजाला समतेचा दिवा देवून लोकशाहीच्या मार्गाने चालण्याची दिशा दाखवली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या समृद्ध लोकशाहीचा भक्कम पाया रचला. त्यामुळे आज प्रत्येक समाज घटकाला विकासाची समान संधी उपलब्ध झाली असल्याचे प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

उदगीर येथील नांदेड ते बिदर मार्गालगत उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा व स्मारकाच्या लोकार्पण समारंभानिमित्त गुरुवारी सायंकाळी तालुका क्रीडा संकुल येथे उपस्थितांना मार्गदर्शन करताना सहकार मंत्री श्री. पाटील बोलत होते. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार अमोल मिटकरी, आमदार संजय बनसोडे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे, भदंत उपगुप्त महाथेरो, भंते पय्यानंद, भंते नागसेन बोधी, शिल्पा बनसोडे, माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निटुरे, उषा कांबळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी सोमानाथ जाधव, भरत चामले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

भारतीय संविधानाच्या निर्मितीसोबतच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेती, सिंचन प्रकल्प, अर्थकारण, समाजकारण यासारख्या विविध क्षेत्राशी निगडीत विषयांवर आपले विचार मांडले केले. त्यांचे हे विचार आजही आपल्याला मार्गदर्शक ठरत आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा आणि स्मारकाचे उद्घाटन उदगीर येथे झाले असून त्यांनी दाखवलेल्या





मार्गावर चालण्यासाठी हे स्मारक व पुतळा प्रेरणा देईल, असा विश्र्वास सहकार मंत्री श्री. पाटील यांनी व्यक्त केला. उदगीर शहरातील विश्र्वशांती बुद्धविहार परिसरातील सुशोभिकरण आणि रस्ते विकास कामांमुळे नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, असे ते म्हणाले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ नाव नाही, तर एक प्रेरणा आहे, एक चेतना आहे. त्यांचा पूर्णाकृती पुतळा उदगीर शहरात उभारण्यात आला असून हा पुतळा पुढील पिढीला संघर्षाची प्रेरणा देत राहील. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याचा आपला सदैव प्रयत्न असून यामाध्यमातून समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी काम करीत असल्याचे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले. विश्र्वशांती बुद्धविहार परिसरात नागरिक, मुलांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बगीचा आणि किडो वंडर लँड व पार्क विकसित केले जाणार आहे, असे आमदार श्री. बनसोडे म्हणाले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेला संदेश आमदार अमोल मिटकरी यांनी यावेळी वाचून दाखविला. उदगीरच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात नमूद केले, तसेच अतिवृष्टीने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिति त्यांनी आपल्या संदेशात दिली.

प्रा. जोगेंद्र कवाडे, रामचंद्र तिरुके यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती अंबेकर यांनी केले. यावेळी गायक आदर्श शिंदे यांच्या भिमगितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांचे लातूर मध्ये जाहीर व्यारव्यान

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्हा शाखा लातूर व शहर शाखा लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांचा जन्मदिवस १ नोव्हेंबर विवेक जागर दिन म्हणून साजरा केला जातो, त्यानिमित्त काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांचे शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोळकर: जागर विवेकाचा या विषयावर हॉटेल अंजनी (सभागृह), छत्रपती शिवाजी चौक, लातूर येथे १ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५ वाजता जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

या व्याख्यानाचा लाभ लातूर शहरातील व शहराच्या सभोवतालील नागरिकांनी घ्यावा, असे आव्हान महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, राज्य प्रधानसचिव रुकसाना मुल्ला, राज्य सरचिटणीस उत्तरेश्वर बिराजदार, राज्य पदाधिकारी अनिल दरेकर, रणजीत आचार्य, बाबा हलकुडे, दिलीप आरळीकर, हरिदास तम्मेवार, जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, जिल्हा उपाध्यक्ष सुनीताताई आरळीकर, अजित निंबाळकर, मुडपे गुरुजी,लातूर शहराध्यक्ष बब्रुवान गोमसाळे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. दशरथ भिसे, जिल्हा प्रधानसचिव सुधीर भोसले, प्रा. डॉ. बळीराम भुक्तरे, हनुमंत मुंडे,लातूर शहर कार्याध्यक्ष डॉक्टर गणेश गोमारे, प्रधानसचिव ज्योती ढगे, बाळासाहेब जगताप, गंगाधर गवळी, श्याम जैन, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, सचिन औरंगे आदी क्रियाशील व समविचारी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी केले आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समिती औरादशहाजानी यांना हमीभाव केंद्र मंजूर; मराठवाड्यातील पहीली बाजार समितीची निवड

**औराद शहाजानी/आयुब बागवान:** कृषी उत्पन्न बाजार समिती औरादशहा येथे माननीय आमदार तथा मा. पालकमंत्री श्री संभाजीराव पाटील निलंगेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीचे कामकाज चालू असून, बाजार समितीने या कार्यकाळामध्ये अनेक मानाचे तुरे शिरपेचात रोवले आहेत, त्यापैकी एक महाराष्ट्र शासना तर्फे शेतकरी मालास हमीभाव केंद्र




नुकतेच जाहीर केले असून महाराष्ट्र मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी एकूण २५ खरेदी केंद्र मंजूर झाले असून लातूर विभागात आठ जिल्ह्यामधून कृषी उत्पन्न बाजार समिती औराद शहाजानी यांचा पहिल्या टप्प्यात पहिला नंबर लागला आहे, खरेदी केंद्राबाबत महाराष्ट्र शासनाने अनेक प्रकारचे निकष लावले होते आणि सर्व निकषांमध्ये औराद बाजार समिती प्रथम आली आहे. हमीभाव खरेदी केंद्र चालू करण्यासाठी रीतसर पणन विभागातर्फे महाराष्ट्र कृषी पणन मंडळाकडे प्रस्ताव बाजार समितीने सादर केला होता, सर्व अटी शर्ती बाजार समितीने पूर्ण केल्यामुळे सदर प्रस्तावाला महाराष्ट्र शासनाने काल मंजुरीत देऊन आज रीतसर पत्र बाजार समितीला दिले आहे, खरेदी केंद्राची नोंदणी करून घेवुन दोन दिवसांमध्ये सर्व शेतकरी बांधवांच्या शेतमालाची नोंदणी बाजार समितीमध्ये केली जाणार आहे. शेतकऱ्यावरील अतिवृष्टी महापौर या संकटातून सावरण्यासाठी निलंगेकर बंधूंनी शेतकऱ्याच्या हितासाठी सर्वप्रथम आपल्या जिल्ह्यामध्ये खरेदी केंद्र स्थापन करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करून शेतकऱ्यांचा कैवारी त्यांच्या शिवाय दुसरा कोण नाही हे परत एकदा सिद्ध केले आहे. या हमीभाव केंद्रामुळे आपल्या भागातील सर्व शेतकऱ्यांचे खूप मोठा फायदा होणार असून ४२०० रुपयाचे सोयाबीन या हमीभाव केंद्रामुळे ५३२८ रुपयांनी खरेदी केले जाणार आहे. हे खरेदी केंद्र मिळवण्यासाठी संचालक मंडळाने एकमताने ठराव करून हमीभाव खरेदी केंद्र मिळवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. या खरेदी केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून सन्माननीय सभापती नरसिंग शामराव बिरादार, व सचिव श्री सतीश मारुती मरगणे हे कामकाज पाहणार आहेत. औराद बाजार समितीच्या इतिहासामध्ये हे पहिल्यांदाच हमीभाव खरेदी केंद्राची योजना सुरू होत आहे. आणि हे हमीभाव खरेदी केंद्र मंजुरीसाठी युवा नेते भाजपा प्रदेश सचिव श्री अरविंद पाटील साहेब यांनी मोलाचे सहकार्य केले आहे. सर्व शेतकरी वर्गातून आनंदाचे वातावरणातून शेतकऱ्यातर्फे बाजार समिती, संचालक मंडळ व निलंगेकर बंधू यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# रेणापूर नगर पंचायत निवडणूकीसाठी काँग्रेस पक्षाचे निरीक्षक जाहीर

**लातूर/प्रतिनिधी :** काँग्रेस पक्षाने आगामी रेणापूर नगरपंचायत निवडणूक पुर्ण ताकदीने लढवून नगरपंचायतीवर माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा झेंडा फडकवण्याचा निर्धार केला आहे.

त्या अनुषंगाने जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे यांनी रेणापूर नगरपंचायत निवडणूक निरीक्षक म्हणून संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्याचे व्हा चेअरमन सचिन पाटील यांची निवड केली आहे. त्यांच्या समवेत प्रभागनिहाय निरीक्षक देखील जाहीर करण्यात आले आहेत.

यामध्ये प्रभाग १ - श्री उमाकांत निवृत्ती खलंग्रे, श्री प्रकाश मनोहर सुर्यवंशी प्रभाग क्रमांक २ - श्री अशोक रामराव राठोड, श्री धनराज गोविंदराव देशमुख प्रभाग क्रमांक ३ - श्री रमेश आण्णासाहेब सुर्यवशी, श्री सुरेश धेनू चव्हाण प्रभाग क्रमाक ४ - ॲड. सिध्दार्थ रोहिदास सोनवणे, ॲड. राजकुमार मंजाजी मस्के प्रभाग क्रमांक ५ - श्री हणमंत बळीराम पवार, ॲड. शेषेराव केशवराव हाके श्री अमर भारत वाकडे प्रभाग क्रमांक ६ - श्री चंद्रकांत रामराव कातळे, श्री विश्वजीत सुधीर पाटील, श्री मुकेश बालासाहेब राजेमाने प्रभाग क्रमांक ७ - श्री महावीर दशरथ देशमुख, श्री बाळकृष्ण विनायकराव माने प्रभाग क्रमांक ८ - श्री धनंजय सुधाकर देशमुख, श्री प्रवीण सतिषराव माने प्रभाग क्रमांक ९ - डॉ. राजकुमार गोपाळराव पाटील, डॉ. उमाकांत सुभाषराव देशमुख प्रभाग क्रमांक १० - ॲड. किशोर अंगद सुर्यवंशी, ॲड. अनंत जीवनराव हिप्परकर प्रभाग क्रमांक ११ - श्री रणजीत राजपाल पाटील, श्री रघुनाथ दिलीप शिंदे, ऋषिकेश मुटकुळे प्रभाग क्रमांक १२ - श्री उमेश अमृतराव बेद्रे, श्री नारायण राजेसाहेब पाटील प्रभाग क्रमांक १३ - श्री परमेश्वर रावसाहेब पाटील, श्री विपीन रमेश गवरे प्रभाग क्रमांक १४ - श्री दिलीप सदाशिव गोटके, श्री विश्वनाथ बळवंतराव कागले, श्री बिभीषण उत्तमराव कदम प्रभाग क्रमांक १५ - श्री उध्दव देविदास जाधव, श्री महेश शिवाजी खाडप प्रभाग क्रमांक १६ - श्री दिनेश दामोदर साळुंके, श्री गंगाधर विठ्ठलराव घोडके प्रभाग क्रमांक १७ - श्री प्रताप नामदेव पाटील, श्री बादल मौलासाब शेख याप्रमाणे प्रभागनिहाय निरीक्षक नेमण्यात आले आहेत.

## दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रेरणा कदमला ड्रॅगन बोट राज्यस्तरीय ज्युनिअर अजिंक्य स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रेरणा कदम हिने नांदेड येथे दि.१६ ते १८ ऑक्टोंबर २०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ड्रॅगन बोट राज्यस्तरीय ज्युनिअर अजिंक्य स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल मिळविले आहे.तिची राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झालेली आहे.यशस्वी विद्यार्थीनीला डॉ.महेश बेंबडे,प्रा. निशिकांत सदाफुले, प्रा.विनोद गेवारे, प्रा.वैष्णवी जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.




सदरील विजयी खेळाडूंचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

## मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार २०२५ प्रसिद्ध ओडिया कवी हरप्रसाद दास यांना जाहीर

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे दिला जाणारा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार (वर्ष २०२५) प्रसिद्ध ओडिया कवी हरप्रसाद दास यांना जाहीर करण्यात आला आहे. लवकरच या पुरस्काराचे वितरण विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या उपस्थितीत केले जाणार आहे.

सन २०१० पासून सुरू झालेला हा पुरस्कार विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत दरवर्षी एका निवडक अ-मराठी कवीला दिला जातो. यात रोख एक लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र दिले जाते. याआधी सुप्रसिद्ध कवी चंद्रकांत देवताले (हिंदी), के. सच्चिदानंदन (मलयाळम), सीतांशू यशश्चंद्र (गुजराथी), सुरजीत पातर (पंजाबी), श्रीमती टेमसुला आओ (इंग्रजी), विष्णू खरे (हिंदी), एच. एस. शिवप्रकाश (कन्नड), अमिताभ गुप्ता (बंगाली), नीलिमकुमार (आसामी), कुमार अंबुज (हिंदी) अशा दिग्गजांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यंदाच्या पुरस्कारासाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखालील निवड



समितीने ओडिया कवी हरप्रसाद दास यांच्या नावाची एकमताने शिफारस केली. समितीत नामवंत कवी व अनुवादक प्रा. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व श्री. विलास गीते यांचा समावेश होता. समितीचे समन्वयक म्हणून कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पहिले, अशी माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी दिली आहे.

ओडिया कवी हरप्रसाद दास यांचा परिचय :-

सन १९४६ मध्ये जन्मलेले हरप्रसाद दास यांची आतापर्यंत एकूण ३५ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यामध्ये बारा काव्यसंग्रह, चार समीक्षा ग्रंथ, एक कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'देश', 'अपार्थिव', 'प्रेम कविता', प्रार्थना के लिये जरुरी शब्द', 'गर्भ गृह' हे काव्यसंग्रह हिंदीतही प्रकाशित आहेत. 'गर्भ गृह'ला साहित्य अकादेमी पुरस्कार मिळाला आहे. 'वंश' काव्यसंग्रहाला भारतीय ज्ञानपीठाचा मुर्तीदेवी पुरस्कार मिळाला आहे. कवितेसाठी असलेला गंगाधर मेहर राष्ट्रीय पुरस्कारही मिळालेला आहे. उडिया जनजीवनाबद्दल त्यांनी तीन खंडांत इतिहास लिहिला आहे.

हरप्रसाद दास यांनी वयाच्या बावीसाव्या वर्षी भारतीय प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. केंद्र सरकारमध्ये विशेष सचिव म्हणून सेवा सुरु असतानाच त्यांची प्रशासकीय ट्रिब्युनलचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. एर्नाकुलम व ओदिशा येथे त्यांनी न्यायदानाचे काम केले. भुवनेश्वर येथील कलिंग तंत्र विद्यापीठात ते प्र-कुलगुरू होते. इन्फिनिटी एज्युकेशन फाउंडेशनचे ते अध्यक्ष होते. त्यांनी जिनिव्हा, बँकॉक, नैरोबी, वॉरसॉ, इंग्लंड, न्यूयॉर्क येथे तज्ञ सल्लागार म्हणून अनेक मंडळांवर काम केले आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने देशभक्तीच्या भावनेतून राष्ट्रीय एकता दिन उत्साही साजरा





**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनी आयोजित एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारे अनेक कार्यक्रम आयोजित केले.

सकाळी डीआरएम कार्यालय ते सोलापूर रेल्वे स्थानकापर्यंत "रन फॉर युनिटी" (एकतेसाठी धाव) आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात विभागीय क्रीडा संघटनेचे सदस्य, भारत स्काउट्स अँड गाईड्सचे स्वयंसेवक, आरपीएफ आणि इतर रेल्वे कर्मचाऱ्यांचा उत्साही सहभाग दिसून आला. सोलापूरचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एडीआरएम) श्री अंशुमाली कुमार यांनी या रन फॉर युनिटी ला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी देखील या कार्यक्रमात सहभागी झाले होते. एकता आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश पसरविण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तदनंतर, सकाळी ११:०० वाजता, डीआरएम कार्यालयात राष्ट्रीय एकता दिनाचा शपथविधी समारंभ आयोजित करण्यात आला. एडीआरएम श्री अंशुमाली कुमार यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना "राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ" दिली. तसेच राष्ट्राची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. सोलापूर रेल्वे विभागातील सर्व विभाग आणि स्थानकांमधील कर्मचाऱ्यांनीही आपापल्या कामाच्या ठिकाणी एकाच वेळी शपथविधी समारंभात भाग घेतला आणि राष्ट्रीय एकात्मता आणि सौहार्दाचे आदर्शांप्रती सामूहिक समर्पण दाखवले.

असे कार्यक्रम मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाच्या एकता आणि राष्ट्रनिर्माणाच्या जोपासना प्रती असलेल्या अढळ वचनबद्ध तेवर प्रकाश टाकतात.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)-.पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दि.३०.१०.२०२५ रोजी अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत ९ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले २,४४० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव, २१० लिटर गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या ६० सिलबंद बाटल्या असे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे १,७८,१०५ आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात खालीलप्रमाणे नोंदवण्यात आले आहेत.

ढोकी पो ठाणेच्या पथकाने ४ ठिकाणी छापे टाकले. सुनिता रा.वाखरवाडी ता. जि.धाराशिव या १८.०५ वा. सु.आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ४,००० किंमतीची १० लिटर गावठी दारु ४० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.अमोल रा. क. तडवळा ता. जि.धाराशिव हे १८.५५ वा. सु. मार्केट यार्डाचे बाजूला क. तडवळा येथे अंदाजे ८०० किंमतीची १०लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.

सुनिल रा. कोंड ता.जि.धाराशिव हे आपल्या राहत्या घराचे बाजूस अंदाजे ५३,००० किंमतीची ५० लिटर गावठी दारु व ६०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. नागनाथ रा. कोंड ता.जि.धाराशिव हे १६.२० वा. सु. आपल्या राहत्या घराचे बाजूस अंदाजे ५१,००० किंमतीची ३० लिटर गावठी दारु व ६०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.

# पाण्याखालील २१ पैकी १४ पुलांचे कठडे तुटले, काही भाग वाहून गेला, परंडा तालुक्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीचा फटका



परंडा(प्रतिनिधी)-परंडा तालुक्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्यांना महापूर आला. त्यामुळे राज्य, जिल्हा मार्गावरील २१ पूल पाण्याखाली गेले होते. अनेक गावांचा संपर्क तुटला होता. पुरामुळे १४ पुलांचे कठडे तुटले आहेत. तसेच पुलाचा भागही वाहून गेला. पुलांची दुरवस्था झाली. ते पूल वाहतुकीस धोकेदायक बनले आहेत. याची सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ दुरुस्ती करावी. दुर्लक्ष केल्यास हानी होण्याची भीती आहे.

तालुक्यातील देऊळगाव खैरी नदीवरील बंधाऱ्याजवळील पुलाचे कठडे वाहून गेल्याने धोकादायक ठरत आहे. रहदारी अधिक असल्याने अपघात होण्याची भीती आहे. विशेष म्हणजे या पुलावरून विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागते. विद्यार्थ्यांचा सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. देऊळगाव-डोंजा या वर्दळीच्या रस्त्यावरील पुलावरील सर्वच संरक्षित लोखंडी कठडे वाहून गेले आहेत.

त्यामुळे रात्री-अपरात्री वाहन चालवताना दुचाकीसह चारचाकी वाहनांचा अपघात होण्याची भीती आहे. पुलालगतच शाळा असल्याने शाळा सुटताना आणि भरताना गर्दी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना धोका होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून देऊळगाव-डोंजा रस्त्याचे काम सुरू आहे. परंतु हे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. एका बाजूला मुख्य रस्त्याचे काम सुरू असताना, दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांना धोका, त्वरित पुलाची दुरुस्ती करावी देऊळगाव-डोंजा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून केलेला रस्ता खैरी नदीवरील पूल दोन्ही बाजूने पुराच्या पाण्याने वाहून गेला.

गार्डही वाहून गेले आहेत. जवळच शाळा असल्यामुळे विद्यार्थ्यांना धोका होऊ शकतो. त्वरित पुलाची दुरुस्ती करावी. अशी मागणीॲड. संतोष सूर्यवंशी यांनी केली असून ते म्हणतात, देऊळगाव अत्यावश्यक असलेल्या पुलाच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम व संबंधित अधिकारी, ठेकेदाराचे दुर्लक्ष होत आहे. दुरावस्थेत असलेल्या पुलांच्या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधून देऊळगाव ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तत्काळ पुलाची दुरुस्ती करून सुरक्षितता पुरवावी, अशी आग्रही मागणी केली आहे. अहवाल वरिष्ठांकडे पाठवला आहे परंडा तालुक्यात सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसामुळे अनेक नद्यांना महापूर आला होता. त्यामुळे राज्य, जिल्हा मार्गावरील २१ पूल पाण्याखाली गेले होते. यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला होता. दरम्यान, राज्य व जिल्हा मार्गावरील १४ पुलांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याबाबतचा अहवाल आमच्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवला आहे. - ऐश्वर्या वडगावे, कार्यकारी उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग परंडा. देऊळगाव ते डोंजा मार्गावरील पुलाचे दोन्ही बाजुचे लोखंडी कठडे पुरात वाहुन गेले.

ग्रामीण मार्ग असलेला परंडा-रुई-दुधी मार्गावर नवीन पुलाचे काम सुरू अन् पर्यायी मार्ग पाण्यात परंडा तालुक्यातील राज्य मार्गावरील १४ पैकी दोन पुलांची तर जिल्हा मार्गावर एकूण ३२ नळकांडी पूल असून, त्यापैकी ११ पुलांची अत्यंत दुरवस्था झाल्याने वाहतुकीस धोकादायक बनले आहेत. ग्रामीण मार्ग असलेला परंडा-रुई-दुधी मार्गावर नवीन पुलाचे काम सुरू असल्याने पर्यायी रस्ता वाहून गेला. त्यामुळे वाहतूक बंद आहे. तसेच साकत मध्यम प्रकल्पाजवळील अर्धा पूल वाहून गेला.

त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे. परंडा तालुक्याला जोडणारा बार्शी मार्गावर सोनगिरी व ब्रम्हगाव येथील पुलाची तसेच कुर्डुवाडी मार्गावरील आवारपिंपरी येथील पुलाचे कठडे वाहून गेल्यामुळे धोका निर्माण झाला आहे. जिल्हा मार्ग असलेले सोनारी, कंडारी, रोहकल, सांकत, अंतरगाव, ईडा, वांगी (बु.) मार्गावरील दोन पुलाची दुरवस्था झाली. कुंभेफळ, जवळा, (नि.) भांडगाव, नळकांडी पुलाची अत्यंत दुरवस्था झाल्याने वाहतूक बंद आहे.

# निवडणुका विकासाच्या मुद्यावर लढणार

## लोहारा तालुका राष्ट्रवादीच्या आढावा बैठकीत: प्रा. सुरेश बिराजदार



उमरगा(प्रतिनिधी)-उमरगा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस विकासाच्या मुद्द्यावरच लढणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार यांनी बलसूर येथे झालेल्या उमरगा-लोहारा तालुका राष्ट्रवादीच्या मंगळवारी (दि. २८) झालेल्या आढावा बैठकीत केले. या वेळी राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष दिग्विजय शिंदे, तालुकाध्यक्ष बाबा जाफरी, तालुकाध्यक्ष सुनील साळुंके, जिल्हा उपाध्यक्ष भीमा स्वामी, अशोक कारभारी, दत्ता इंगळे, बाजार समितीचे संचालक नेताजी कवठे यांच्यासह दोन्ही तालुक्यांतील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी प्रा. बिराजदार म्हणाले, राष्ट्रवादीचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादीच्या माध्यमातून विविध विकासकामे झाली आहेत. मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध केला आहे. उमरगा अन् लोहारा तालुक्यात रस्त्यांसाठी विकास निधी आला. लाडकी बहीण, अतिवृष्टीचे शेतकऱ्यांना अनुदान, जिल्ह्यातील बानगंगा व भाऊसाहेब बिराजदार सहकारी साखर कारखाने चालू करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक दर मिळवून दिला. बैठकीला लहुजी शक्ती सेनेचे उमरगा तालुकाध्यक्ष राम कांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या वेळी प्रकाशसिंह सुभेदार, गोजर बनसोडे, संजय जाधव, भरत बिराजदार, प्रताप महाराज, अमोल ओवंडकर, संदीपान पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. फुले -आंबेडकरांच्या विचारावर चालणारी राष्ट्रवादी राष्ट्रवादी शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारावर चालणारा पक्ष आहे. जातीपातीचे राजकारण न करता फक्त सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवून काम करतो. तर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका या केलेल्या विकासकामांचे जोरावर विकासासाठी आम्ही मत मागणार आहोत. राष्ट्रवादी पक्षाला महायुतीत असून, महायुती म्हणून निवडणुकीस सामोरे जावू. अन्य कारणाने वेगवेगळे लढण्याची गरज भासल्यास राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी तयार राहावे, असे प्रा. बिराजदार यांनी मत व्यक्त केले.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव मध्ये राष्ट्रीय एकता दिवस मोठ्या उत्साहात साजरा



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून २०१४ पासून साजरा केला जातो याच दिवशी भारताचे पहिले उपपंतप्रधान, पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म झाला होता. त्यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव चे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी स्कूलचे उपप्राचार्य श्री निलेश जाधव सर तसेच कार्यक्रमाधिकारी श्री दीपक अंकुश सर व शिक्षक निलेश साखरे सर यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केली. त्यानंतर स्कूलचे उपप्राचार्य निलेश जाधव सर यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या विषयी आपले मत मांडत असताना त्यांनी आपल्या जीवनामध्ये खास करून राजकीय व सामाजिक जीवनामध्ये कशा पद्धतीने संघर्ष केला आणि तो संघर्ष आजच्या युगातील राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात अनमोल असा आहे. त्याचबरोबर आपण देखील त्यांच्याप्रमाणे कणखर व देशाभिमुख कार्य करत राहावे असे आवाहन केले.

तसेच याप्रसंगी मोठ्या संख्येने पालक वर्ग, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, उपस्थित होता.

# प्रतीक पाटील यांचा जळकोट ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार



जळकोट(विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील पार्वती कन्या प्रशालेचे सहशिक्षक श्री. पंडित पाटील सर यांचे चिरंजीव प्रतीक पाटील यांची उच्च शिक्षणासाठी जर्मनी देशात निवड झाल्याबद्दल जळकोट ग्रामपंचायतच्या वतीने दिनांक ३१-१० -२०२५ रोजी मानाचा फेटा, शाल, पुष्प हा व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या . यावेळी गावचे सरपंच गजेंद्र कदम, माजी सरपंच अशोक भाऊ कदम, प्रकाश चव्हाण,कृष्णात मोरे, ग्रामपंचायत सदस्य महेश कदम, बसवराज कवठे, पंढरीनाथ कदम,बाळासाहेब कदम, अभिमन्यू कदम सर, पिंटू कारले, चंद्रकांत स्वामी सर, डी.डी .कदम सर, शंकर कदम, दत्तात्रय चुंगे, अमोल आलुरे, ब्रह्मानंद कदम व तसे गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अल्युमिनियम तार चोर स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात



धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक ३०/१०/२०२५ रोजी माला विषयीचे गुन्हे उघडकीस आणणे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक पेट्रोलिंग करत पोस्टे कळंब हद्दीत असताना माहिती मिळाली की, संशयित अब्दुल रा. कळंब ता.कळंब जिल्हा धाराशिव याने ढोकी परिसरात तारेची चोरी केली आहे. अशी बातमी मिळाल्यावर त्यास सिताफिने ताब्यात घेऊन त्याने केलेल्या चोरीची तसेच त्याच्या साथीदाराबाबत माहिती विचारली असता त्याने ढोकी हद्दीत गोवर्धन वाडी येथे ल्युमिनियम तार साथीदारांच्या मदतीने चोरी केली असल्याचे सांगितले. तसेच गुन्हे अभिलेख पाहिला असता पोलीस ठाणे ढोकी येथे सदर बाबत गुन्हा नोंद असल्याची माहिती मिळाली . त्याच्याकडे मुद्देमालाबाबत विचारणा केली असता त्याने मुद्देमाल बाबत माहिती दिली. ताब्यात असलेल्यांकडून गुन्ह्यात वापरलेली महिंद्रा पिकअप आणि चोरी केलेला मुद्देमाल पाच किलोमीटर अल्युमिनियम ची तार असा एकूण १०,००,००० रुपयांचा मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला आहे . ताब्यात असलेल्या आरोपीने त्याच्या अन्य साथीदाराच्या मदतीने सदरचे गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्याची वैद्यकीय तपासणी करून रिपोर्ट सह पोलीस ठाणे ढोकी येथे पुढील कारवाई कामी हजर केले आहे .

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर व अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार,पोहेका शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फरहान पठाण, चापोका रत्नदीप डोंगरे, नागनाथ गुरव यांच्या पथकाने केली आहे.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649